भक्ती आणि शक्तीचा,
ज्ञान व विज्ञानाचा,
कला आणि
संस्कृतीचा
हा महाराष्ट्र माझा !

महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा...!

महाराष्ट्र दिन

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ०१ मे २०२६

नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७

पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**




**मुंबई (दै. संध्या)**

राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली. याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे.

आतापर्यंत कोविड - १९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

### सूचना

दैनिक संध्या

महाराष्ट्र दिनानिमित्त 'दैनिक संध्या' कार्यालयास शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी सुट्टी असल्याने शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी चा अंक प्रसिध्द होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.


– संपादिका

## बच्चू कडू यांचा शिवसेनेत प्रवेश

मुंबई (दै. संध्या) आंदोलन करणाऱ्यांना सत्तेबाहेर ठेवण्याची परंपरा मोडीत काढत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी खेळी केली आहे. बच्चू कडू यांना शिवसेनेत घेत थेट विधान परिषदेची उमेदवारी देत त्यांनी "रस्त्यावरचा आवाज थेट निर्णयप्रक्रियेत" आणण्याचा नवा राजकीय प्रयोग केला आहे. या घडामोडीसोबतच शिवसेनेने विधान परिषद निवडणुकीसाठी दोन नावे जाहीर करत राजकीय समीकरणांना वेग दिला. बच्चू कडू यांच्यासह माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना उमेदवारी देण्याची घोषणा स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. अर्ज



भरण्याच्या अंतिम मुदतीला अवघे दोन तास शिल्लक असताना घेतलेल्या या निर्णयाने राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली. शेवटच्या क्षणापर्यंत दुसऱ्या उमेदवाराबाबत सस्पेन्स कायम ठेवत शिंदेंनी आपल्या निर्णयक्षमतेचा ठसा उमटवला.






# संपादकीय

## समावेशकतेचा गैरअर्थ

पूर्वी ग्राहक केवळ वस्तूचा दर्जा पाहून खरेदी करत असे. मात्र, आताचा ग्राहक 'जागरूक' आणि 'वैचारिक' आहे. तो केवळ चष्मा किंवा दागिना विकत घेत नाही, तर त्या ब्रँडच्या विचारसरणीशीही स्वतःला जोडून घेतो. आजचा ग्राहक स्वतःच्या सांस्कृतिक मूल्यांशी तडजोड करण्यास तयार नाही. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि या विविधतेचा पाया हिंदू समाजाच्या सहिष्णुता व सर्वसमावेशकतेत आहे. बहुसंख्य हिंदू समाज सहिष्णू व सर्वसमावेशक आहे. ही सर्वसमावेशकता इथल्या मातीत, विचारात आणि संस्कृतीत रुजलेली आहे. इतकी परकीय आक्रमणे झाली, अनेक जाती - धर्मांचे लोक इथे आले, त्या सगळ्यांना इथे सामावून घेतले. पारसी, ख्रिश्चन, अगदी मुस्लीम आदी सगळ्यांना सामावून घेतले आहे. त्यामुळेच भारतात विविधतेत एकता दिसून येते; मात्र सध्या अभिव्यक्तीच्या नावाखाली धार्मिक तुष्टीकरणाचा प्रयत्न होत असल्याचा आरोप 'लेन्सकार्ट'सारख्या घटनांमधून समोर येत आहे. कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी काही मार्गदर्शक सूचना केल्या होत्या. त्यामध्ये हिजाब, पगडी यांना परवानगी; मात्र टिकली, टिळा यांसारख्या हिंदू प्रतीकांवर निर्बंध असल्याचा दावा समोर आल्यानंतर समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. कंपनीने नंतर स्पष्टीकरण दिले असले, तरी तो मुद्दा थेट धार्मिक समानतेच्या भावनेशी जोडला गेला आहे. या वादविवादामुळे कंपनीच्या समभागांत मोठी घसरण पाहायला मिळाली. कंपनीचा शेअर सुमारे ५ टक्क्यांनी खाली आला. गुंतवणूकदारांच्या विश्वासार्हतेवर याचा नकारात्मक परिणाम झाला. विविध अहवालांनुसार, या वादामुळे कंपनीच्या बाजारमूल्यात मोठी घट झाली आहे. अवघ्या ५ दिवसांत कंपनीचे बाजार मूल्य हजारो कोटी रुपयांनी कमी झाले आहे. आर्थिक नुकसानीपेक्षाही कंपनीच्या सामाजिक प्रतिमेला बसलेला फटका अधिक मोठा आहे. प्रसारमाध्यमांमध्ये या विषयावर चर्चा झाली. संतापलेल्या ग्राहकांनी प्रत्यक्ष कृती करत खरेदी केलेले चष्मे तोडून निषेध व्यक्त केला. कंपनीच्या नवीन ऑर्डर मोठ्या प्रमाणात रद्द झाल्या. सध्या चर्चेत असलेले 'लेन्सकार्ट' प्रकरण आणि 'तनिष्क' जाहिरात वाद - या दोन घटनांमध्ये काही वर्षांचे अंतर असले, तरी त्या दोन्हींच्या केंद्रस्थानी असलेला प्रश्न मात्र तोच आहे, तटस्थता आणि समानतेचा नेमका अर्थ काय? चार-पाच वर्षांपूर्वी घडलेली तनिष्कची घटना आणि आज समोर आलेले 'लेन्सकार्ट' प्रकरण या दोन्हींकडे एकत्रितपणे पाहिले, तर समाजातील बदलती मानसिकता आणि वाढती जागरूकता स्पष्टपणे दिसून येते. चार - पाच वर्षांपूर्वी, तनिष्कच्या जाहिरातीने मोठा वाद निर्माण निर्माण झाला होता. त्या जाहिरातीत आंतरधर्मीय विवाहाचे चित्रण होते. अनेकांनी या जाहिरातीचे स्वागत केले, कारण ती आधुनिक आणि प्रगतिशील विचार मांडणारी वाटत होती; मात्र, समाजातील एका मोठ्या वर्गाला जाहिरातीमधील सादरीकरणात एकतर्फीपणा जाणवला. त्यांच्या मते, अशा प्रकारच्या सादरीकरणातून विशिष्ट धार्मिक-सांस्कृतिक दृष्टिकोनाला अधिक महत्त्व दिले जात होते. समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर विरोध झाल्यानंतर अखेर कंपनीला ती जाहिरात मागे घ्यावी लागली. या घटनेनंतर काही काळ गेला, पण त्यातून निर्माण झालेले प्रश्न कायम राहिले. आता, वर्तमान काळात 'लेन्सकार्ट' प्रकरणाने तेच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणले आहेत. कंपनीच्याअंतर्गत धोरणाने समाजात धार्मिक तेढ निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली. कंपनीने याबाबत स्पष्टीकरण दिले असले, तरी समाजातील प्रतिक्रिया तत्काळ उमटली. वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर लेन्सकार्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीयूष बन्सल यांनी स्वतः भूमिका स्पष्ट केली. समाजमाध्यमांवर व्हायरल झालेला तो दस्तऐवज जुना असून, तो कंपनीच्या सध्याच्या अधिकृत धोरणाचे प्रतिनिधित्व करत नाही, असे त्यांनी नमूद केले. कंपनीमध्ये कोणत्याही धार्मिक चिन्हांच्या वापरावर बंदी नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी या प्रकरणाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. या वादानंतर कंपनीने तातडीने एक नवीन निवेदन प्रसिद्ध केले आहे. यात नमूद केले आहे की, कर्मचारी बिंदी, टिळक, सिंदूर, कडा, हिजाब आणि पगडी यांसारखी सर्व धार्मिक व सांस्कृतिक प्रतीके मुक्तपणे वापरू शकतात.

## संस्कृत सुभाषित

अर्धभार्यामनुषस्य, भार्या श्रेष्ठसम. सखा

अर्थ – पुरुषाची अर्धांगिनी असणारी भार्या हीच त्याची श्रेष्ठ अशी सखा म्हणजे मित्र होय. असे सुभाषितकार म्हणतात. स्त्री ही अशा प्रकारे पुरुषाच्या बरोबरीने महत्त्वाची आहे.

## गुरु वचन



### राजाचे अहोभाग्य

पुरातनकाळातील गोष्ट आहे. एक परमतपस्वी साधूसंत होते. ते जंगलामध्ये परमेश्वराचे भजन आणि साधनामध्ये तल्लीन राहत असायचे. एका दिवशी त्यांनी जास्तीचे अन्न गोळा करायचे नाही, असा निश्चय केला होता. पाहुण्यांनाही आपल्या भिक्षेतील अर्धे अन्न देऊन परमसुखाचा अनुभव घेत होते. एका दिवशी ते राजाजवळ गेले आणि म्हणाले की, या भागात दुष्काळ पडला आहे. राजधर्मानुसार हे लक्षात ठेवा की, प्रजेतील एकही व्यक्ती उपासी रहायला नको. राजाने दुष्काळ पीडितांची सेवा करण्याचा दृढ निश्चय केला. जाताजाता राजाने साधूला धन देण्याचा आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले राजन मला एका वेळेची भिक्षा द्या. मी धन व अन्नाचा संग्रह करत नाही. मी माझ्या झोपडीपट्टीसमोरील उंबराचे फळ खाऊन माझे जीवन व्यतीत करत आहे. राजाने विचार केला की, साधू धन घेण्यास इन्कार करत आहे. राजाने आपल्या मंत्रीला काही उंबराचे फळ आणायला सांगितले. आणि त्यामध्ये सोने, चांदी, हिरे भरुन साधूच्या उंबराच्या झाडाखाली टाकले. साधूने खाण्यासाठी जेव्हा उंबर उचलले आणि तोडून बघितले तर त्यामध्ये सोने आणि हिरे पाहून ते जमीनवरच फेकून दिले. राजाने संध्याकाळी गुप्तमंत्रीला तिथे पाठवले. मंत्र्याला उंबर तिथेच पडलेले दिसले. जेव्हा त्याने राजाला जाऊन सांगितले असता, राजा म्हणाला माझ्या राज्यात असे साधू आहेत. त्यामुळे मी नशीबवान आहे.

## उपदेशकथा

### मन:शांती

अनेक महापुरुषांनी सांगितलेले उपाय करुन थकलेला एक तरुण विवेकानंदांजवळ आला नि म्हणाला, '' स्वामीजी तासन् तास बंद खोलीत बसून मी ध्यानधारणा करतो, परंतु मनाला शांती लाभत नाही.'' त्यावर स्वामीजी म्हणाले, '' सर्वात प्रथम खोलीचा दरवाजा उघडा ठेव. आपल्या जवळपास राहणाऱ्या दु:खी, रोगी व भुकेल्या माणसांचा शोध घे. त्यांना यथाशक्ती मदत कर.'' यावर त्या तरुणाने त्यांना, '' एखाद्या रोग्यासी सेवा करताना मीज आजारी पडलो तर?'' असा प्रश्न विचारला. विवेकानंद म्हणाले, '' तुझ्या या शंकेमुळे मला असे वाटते की, प्रत्येक चांगल्या कार्यात तुला काहीतरी वाईट दिसते. म्हणूनच तुला शांती लाभत नाही. शुभकार्याला उशीर लावू नये तसेच त्यातील उणिवाही शोधू नयेत. हाच मन:शांती मिळविण्याचा जवळचा मार्ग आहे.''

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | हिजरी सन् – १४४५ |
| १ एप्रिल २०२६ | मुस्लिम मास – जिल्काद |
| शुक्रवार | तारीख – १४ |
| विक्रम संवत्– २०८२ | विशेष |
| वैशाख शके | बुद्धपौर्णिमा |
| संवत्– १९४८ | कूर्म जयंती |
| संवत्सर –पराभवनाम | महाराष्ट्र दिन |
| अयन– उत्तरायणारंभ | मराठी राजभाषा दिन |
| मास– वैशाख | मे दिन |
| ऋतु– सौर ग्रीष्म | आंतरराष्ट्रीय कामगार दनि |
| शुक्ल पक्ष | महादेवपुरी महाराज |
| तिथि:पूर्णिमा २२:५२:५६ | पुण्यतिथी – कोकर्डा |
| नक्षत्र:स्वाती २८:३५:०३+ | (अमरावती) |
| योग:सिद्ध २१:१२:४४ | पुष्टिपती विनायक जयंती |
| करण:विष्टि १०:००:३७ | वैशाखस्नान समाप्ती |
| करण:बव २२:५२:५६ | पौर्णिमा समाप्ती |
| सूर्य:मेष | रात्रौ १०.५२ |
| चन्द्र:तुला | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | | 1 | 8 | | 9 | |
| 8 | | | | | 6 | 7 | | 2 |
| | 1 | 5 | | | 7 | 3 | 8 | |
| | 7 | 3 | | | | 1 | | 5 |
| 5 | | | | | | | | 7 |
| 1 | | 2 | | | | 9 | 3 | |
| | 5 | 1 | 2 | | | 6 | 7 | |
| 4 | | 6 | 9 | | | | | 3 |
| | 8 | | 6 | 5 | | | 4 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १३५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 8 | 5 | 6 | 4 | 2 | 9 | 3 |
| 6 | 5 | 2 | 9 | 7 | 3 | 1 | 8 | 4 |
| 3 | 9 | 4 | 1 | 2 | 8 | 5 | 6 | 7 |
| 1 | 8 | 7 | 3 | 9 | 6 | 4 | 5 | 2 |
| 4 | 3 | 5 | 2 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 2 | 6 | 9 | 4 | 5 | 1 | 3 | 7 | 8 |
| 9 | 4 | 6 | 8 | 3 | 5 | 7 | 2 | 1 |
| 8 | 7 | 3 | 6 | 1 | 2 | 9 | 4 | 5 |
| 5 | 2 | 1 | 7 | 4 | 9 | 8 | 3 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०४५ – ग्रेगोरी सहावा पोपपदी.
- १३२८ – एडिनबर्ग–नॉर्थहॅम्पटनचा तह – इंग्लंडने स्कॉटलंडला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिली.
- १७०७ – ऍक्ट ऑफ युनियन – इंग्लंड व स्कॉटलंडने एकत्र येउन ग्रेट ब्रिटन या राष्ट्राची निर्मिती.
- १८३४ – इंग्लंडच्या वसाहतीतून गुलामगिरीची प्रथा कायदेबाह्य ठरवण्यात आली.
- १८६३ – अमेरिकन गृहयुद्ध–चान्सेलरव्हिलची लढाई.

### राष्ट्रीय

- १९६० – मुंबई राज्याचे दोन भाग होऊन गुजराथ आणि महाराष्ट्र राज्य बनले.
- २००६ – बडोद्यात दर्गा हटविण्यावरून झालेल्या दंगलीत २ जण ठार झाले.
- २००७ – तामिळनाडुत ट्रक कालव्यात कोसळून ६ जण ठार झाले.

### जन्म

- १२१८ – रुडॉल्फ पहिला, पवित्र रोमन स्राटाचे जन्म.
- १९१५ – आधुनिक हिंदी कवी 'अंचल' रामेश्वर शुक्ल यांचा जन्म.
- १९२० – हिंदी आणि वंग चित्रपटसृष्टीतील गायक मन्ना डे यांचा जन्म.
- १९४४ – सुरेश कलमाडी, भारतीय राजकारणी यांचा जन्म.
- १९५१ – गॉर्डन ग्रीनीज, वेस्ट इंडीजचा क्रिकेटपटूंचा जन्म.

### निधन

- ४०८ – आर्केडियस, रोमन स्राटाचा निधन.
- १३०८ – आल्बर्ट पहिला, हॅब्सबर्गचा राजा यांचे निधन.
- १५७२ – पोप पायस पाचवा यांचे निधन.
- १९३१ – योहान लुडविग बाख, जर्मन संगीतकाराचे निधन.

## : SMS :

Boy: Mujhse shadi karogi?
Girl: Kya?
Boy: Kitni achi film hai na?
Girl: Kuttay k bache..
Boy: Kya?
Girl: Kitny Cute hotey hain na?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.७ | २६.७ |
| अहमदनगर | ३८.६ | २५.५ |
| अकोला | ४१.६ | २९.१ |
| अमरावती | ४१.८ | २८.८ |
| बीड | ४३.६ | ३०.९ |
| भंडारा | ४२.१ | ३०.१ |
| बुलढाणा | ३६.५ | २५ |
| चंद्रपूर | ४३.४ | ३१.१ |
| चेन्नई | ४७ | ३१.२ |
| नवी दिल्ली | ३६.८ | २७.४ |
| धुळे | ४१ | २७.२ |
| गोंदिया | ४१.१ | २९.४ |
| जळगाव | ४१.३ | २८.३ |
| कोल्हापूर | ३९.४ | २१.९ |
| लातूर | ३८.७ | २७.४ |
| मुंबई | ३८.४ | ३०.८ |
| नागपूर | ४२.२ | २८.६ |
| नांदेड | ४१.१ | २९.९ |
| नंदूरबार | ३६.८ | २७ |
| नाशिक | ३७.६ | २३.४ |
| पुणे | ३६.४ | २२.८ |
| पंढरपूर | ३९.६ | २८.१ |
| सातारा | ३९ | २१.२ |
| सांगली | ४०.६ | २३.१ |
| सोलापूर | ४०.७ | २८.९ |
| वर्धा | ४२ | २९.४ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला सिद्ध होऊ शकेल.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम धाडसाने विरोधकांचा पराभव करु शकाल. सामाजिक प्रशंसनेने आनंद होईल.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर वाद–विवाद आणि भांडणांनी मानसिक त्रास वाढेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर सामाजिक कार्यात आपला सहभाग राहील. महत्तवाची कामे पूर्ण करु शकाल.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर जवळच्या व्यक्तींकडून उपयोगी सल्ला मिळेल. राज्यपक्षच्या कामासाठी दिवस चांगला राहील.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळेवर कामे न झाल्यामुळे चिंता वाढेल. खर्च अधिक होईल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल. नोकरीत बढती मिळण्याचे योग येतील.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण जुनी समस्या दूर होण्याची शक्यता आहे. दृढ निश्चय असल्या कारणाने प्रत्येक क्षेत्रात यश मिळेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम कुंटूबासमवेत वेळ मनोरंजनात जाईल. व्यापारात नवीन संबंध जुळून येतील, जे भविष्यात फायदेशीर ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर कौटूंबिक तसेच संपत्ती संबंधातील अडचणींचे समाधान शक्य आहे. मिळकतीत वाढ होईल.

**कन्या :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपल्या प्रयत्नांनी घरगूती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती उत्साहवर्धक राहील.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर सज्जन माणसांचा सहवास लाभेल. अभ्यासात मन रमेल. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोप्रियता मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १३६



### आडवे शब्द

१. काकाची मुलगी
४. सदरा
७. पुन्हा
९. खेळी
१०. आश्रय, टेकू
११. लोह
१२. अंगयष्टी
१४. मर्यादा, सीमा
१५. जिवलग मित्र
१६. सुदर्शनधारी
१८. रम्य, मनोहर
१९. काळे मीठ, पादेलोण
२३. फुलातील पुकेसर
२४. दहावी रास
२६. टीका करणारा
२९. तेव्हा (ग्रा.)
३१. कापड विणण्याचे साधन
३२. संताप, क्रोध
३४. जलप्रवासाचे साधन
३६. एकत्र वाटचाल
३८. मनाला आलेला थकवा
४०. थोडे, अल्प
४२. आवाज
४३. श्रीमंत
४५. उचलण्यास कठीण असे
४६. वार्धक्य वा मृत्यू नसलेला
४८. डोळे, लोचन
५०. झकास, छान
५१. पोलादाचे 'स्टेनलेस स्टील' करणारा धातू
५२. ज्याच्या पराक्रमाची नोंद होत नाही असा वीर
५४. आतील गोटातील
५५. राज्यकारभाराचे शहर
५७. पूर्ण बदल, कायपालट
५९. दरवाजा
६१. दारूचा एक कडक प्रकार
६२. श्वापद, पशू
६३. शिर्डीची माऊली
६४. पाणी
६५. टक, दृष्टी
६७. सावध व्यवहारीपणा
६८. तुझे
६९. हिरव्या आणि तांबड्याही रंगाची पालेभाजी
७०. निद्रा, झोप
७१. तमाशा
७३. ढालीसह रणांगण गाजवणारी
७५. तात्पर्य
७६. दुर्दशा
७८. तेजस्वी (डोळे, मोती इ.)
८०. माया, प्रेम
८१. थट्टा, चेष्टा करणारा
८२. जाणकार, माहिती असलेला

### उभे शब्द

१. लग्नाच्या हिरव्या बांगड्या
२. त्वरित
३. बगळा
४. काळोख
५. मगज
६. दुय्यम, दुसरा
७. पेच, खोटी
८. पृथ्वी
१०. ध्वनी
१३. धमकी
१४. चालविणारा अवयव
१५. अखंड
१७. पुण्यात सिनेमा प्रदर्शनाची मुहूर्तमेढ रोवणारे (फक्त आडनाव), हिंदीत वाचक
१९. तुरुंगवास
२०. रंग
२१. नमस्कार
२२. 'गणपती बाप्पा –––, पुढच्या वर्षी लवकर या'
२३. प्रतिष्ठा, वजन, अब्रू
२४. नंतर
२५. रोग्यास रक्त देणे
२७. अंजन
२८. आजच्या आधीचा दिवस
३०. मरेपर्यंत
३१. सन्मानाची अल्प रक्कम
३३. गरजू
३५. दृष्टीभेट
३७. शंकर
३९. डोंगर, डोंगरी किल्ला
४१. कौसल्यापुत्र
४४. वाईट इच्छा
४६. शेवट, नाश, अखेर
४७. रात्र
४९. एकूण एक, सर्व
५०.मत देण्याची क्रिया
५२. थोडे
५३. भेसळीच्या जमान्यात असे दूध मिळणे मुश्कीलच!
५४. हनुमानाच्या आईचे नाव
५६. कामाची मोठी गडबड
५७. अक्षराची उभी रेघ
५८. लाकूड कापणारी
६०. चंद्र
६२. सूचना, इशारा
६४अ. जैसे थे परिस्थती
६६. मातीचा कण
७२. घाव घालण्याचे मोठे शस्त्र
७४. जवळ, निकट
७५. चार वेदांपैकी एक
७७. मत्सर
७८. पवित्र
७९. लक्ष्मीचे एक नाव

### जम्बो शब्दकोडे क्र. १३५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.परावलंबी ६.खुसखुशीत ११.राजस १२.नजरकैद १५.तळमळ १७.नच १९.मावा २०.शराब २२.भला २४.वनसरणी २७.पारख २९.क्षमायाचक ३२.रथ ३३.पापड ३५.पर ३६.चरणकमळ ३८.विनाकरण ३९.काना ४०.नाना ४१.सांज ४२.काल ४३.मरगळ ४५.यम ४७.पोरगा ४८.वाहतूक ५०.अनेकदा ५२.डाक ५४.रटरट ५७.रसदार ६०.हाण ६१.मावळण ६२.जनक ६४.फसल ६५.खासगत ६६.हालहवाल ६८.खातरजमा ७१.कंप ७२.जर ७३.पर ७५.मज ७६.नरक ७८.आग ७९.रस ८०.कथा ८३.आयत्या बिळात नागोबा ८४.रावणाचा लेक

उभे उत्तर : १.परान्नभक्षण २.राज ३.वसन ४.बीन ५.सारवान ७.सबब ८.शीतल ९.तळ १०.कोळ १३.जमाव १४.दशरथ १६.महिरप १८.चराचर २१.राणी २३.लामा २५.सरळ २६.उपकार २८.खरबूज ३०.याचना ३१.कणखर ३३.पाना ३४.डर ३७.मधाळ ३८.विनायक ३९.कालहरण ४१.सांगाडा ४२.कावा ४३.मकर ४४.गज ४६.मदार ४७.पोशिंदा ४९.तूट ५१.नेपाळ ५३.कनकचंपक ५५.टरफल ५६.हमाल ५८.समसमान ५९.रजत ६०.हातोहात ६३.सहजगत्या ६५.खाज ६७.वार ६९.तम ७०.रजक ७३.परत ७४.रसना ७७.रमणा ७८.आय ८१.थारा ८२.आले

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बनारस - पुणे (हडपसर) अमृत भारत एक्सप्रेसचे हडपसर रेल्वे स्थानकावर स्वागत

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकताना, माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांनी दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी बनारस - पुणे (हडपसर) अमृत भारत एक्सप्रेस या नव्या रेल्वे सेवेचे उद्घाटन केले. या ऐतिहासिक प्रसंगी, पुणे महानगरपालिकेच्या महापौर मा. श्रीमती मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत ३० एप्रिल २०२६ रोजी रात्री ०० वाजून २५ मिनिटांनी हडपसर रेल्वे स्थानकावर या गाडीचे भव्य स्वागत करण्यात आले. मध्य रेल्वे, पुणे विभागाच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. एच. कुमार वर्मा (IRSS) यांनी हा स्वागत समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमास नगरसेवक सुनीलजी पांडे ,नगरसेवक मारुती आबा तुपे, नगरसेवक रविंद्रजी साळेगावकर उपस्थित होते. अमृत भारत एक्सप्रेसची वैशिष्ट्ये : अमृत भारत एक्सप्रेस ही गाडी प्रवाशांना जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. यामध्ये एर्गोनॉमिकली डिझाईन केलेले बर्थ, स्वयंचलित दरवाजे, उन्नत स्वच्छता सुविधा, आणि कवच या अत्याधुनिक सुरक्षा प्रणालीचा समावेश आहे. या उद्घाटन सोहळ्यात पुढील दोन नव्या गाड्यांचे लोकार्पण करण्यात आले : १. बनारस - पुणे (हडपसर) अमृत भारत एक्सप्रेस २. अयोध्या कॅन्ट - मुंबई (लोकमान्य टिळक टर्मिनस) अमृत भारत एक्सप्रेस महापौर मा. श्रीमती मंजुषा नागपुरे यांनी यावेळी सांगितले की, “हडपसर रेल्वे स्थानकावर अमृत भारत एक्सप्रेसचे आगमन हे पुणेकरांसाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. भारतीय रेल्वेच्या या आधुनिक सेवेमुळे पुणे आणि बनारस या दोन सांस्कृतिक शहरांमधील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.”

### पाषाण तलावातील प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबवा : महापौर

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरातील महत्त्वपूर्ण जलस्रोत असलेल्या पाषाण तलावातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर महापौर मॅडम यांनी आज तलाव परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला तातडीने अंमलबजावणी करत ठोस व परिणामकारक उपाययोजना राबविण्याचे कडक निर्देश दिले. या पाहणीदरम्यान तलावातील पाण्याची गुणवत्ता, वाढता दूषितपणा तसेच सीओडी (Chemical Oxygen Demand) व बीओडी (Biochemical Oxygen Demand) यांच्या पातळीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तलावात येणाऱ्या सांडपाण्यामुळे प्रदूषणात लक्षणीय वाढ होत असल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात उभारण्यात आलेल्या एसटीपी (Sewage Treatment Plant) प्रकल्पांची कार्यक्षमता तपासून, प्रक्रिया केलेले पाणी निर्धारित निकषांनुसारच तलावात सोडले जाईल यासाठी काटेकोर देखरेख ठेवण्याचे आदेश देण्यात आले. तसेच पुणे महानगरपालिकाच्या हद्दीपर्यंतचे नाले, पाणीप्रवाह व संबंधित यंत्रणांची सखोल पाहणी करण्यात आली. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, अडथळे तसेच अनधिकृत सांडपाणी सोडण्याच्या प्रकारांवर तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तलावात थेट जाणारे दूषित पाणी रोखण्यासाठी स्वतंत्र नाले उपयोजना (Drainage Diversion) प्रभावीपणे राबविण्याचे आदेशही देण्यात आले. पाषाण तलावाचे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी खालील उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले. या पाहणीदरम्यान नगरसेविका सौ. रोहिणी चिमटे व नगरसेविका सौ. मयुरी कोकाटे उपस्थित होत्या. तसेच प्रशासनाच्या वतीने उपायुक्त (पर्यावरण) सौ. किशोरी शिंदे व आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. गणेश सोनुने यांनी सहभाग घेतला. महापौर मॅडम यांनी स्पष्ट केले की, पाषाण तलावाचे संवर्धन व प्रदूषणमुक्ती ही शहराच्या पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब असून, सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून अल्पावधीत ठोस व दृश्यमान परिणाम साध्य करावेत.




### सह्याद्रि रुग्णालय : पुणे शहराच्या अत्याधुनिक न्यूरोसर्जरी उपचारांचे प्रमुख केंद्र म्हणून उदय

पुणे (दैनिक संध्या) : सह्याद्रि हॉस्पिटलने वैद्यकीय उपचारामध्ये नवा विक्रम नोंदवला आहे. हॉस्पिटलने गेल्या पाच वर्षांत ७५० हून अधिक मायक्रोव्हस्कुलर डिकंप्रेशन (एमव्हीडी) शस्त्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. मेंदूच्या नसांवर येणा-या दबावामुळे उद्भवणाऱ्या गंभीर व्याधींवर उपचार करण्यासाठी ही अत्याधुनिक शस्त्रक्रिया मायक्रोव्हस्कुलर डिकंप्रेशन ही प्रभावी शस्त्रक्रिया मानली जाते. ट्रायजेमिनल न्यूराल्जिया, ग्लोसोफॅरिंजियल न्यूराल्जिया हेमिफेशियल स्पॅझम यांसारख्या आजारांनी त्रस्त असलेल्या शेकडो रुग्णांना या यशस्वी शस्त्रक्रियांमुळे वेदनामुक्त आयुष्य मिळाले आहे. आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्याने सह्याद्रि हॉस्पिटलने न्यूरोसर्जरी क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. सह्याद्रि हॉस्पिटलच्या न्यूरोसर्जरी पथकाने गेल्या २२ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात तब्बल २ हजार ७०० हून अधिक एमव्हीडी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. हा आकडा पाहता न्यूरोसर्जरी पथकाच्या प्रदीर्घ अनुभवाचा मोठा पुरावा आहे. सह्याद्री हॉस्पिटलचे प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. जयदेव पंचवाघ यांच्या नेतृत्वाखाली या पथकाने हे यश संपादन केले आहे. अनेक दशकांचा अनुभव आणि तांत्रिक कौशल्य यांच्या जोरावर या पथकाने मेंदूशी संबंधित गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये विशेष नैपुण्य मिळवले असून, शेकडो रुग्णांना वेदनामुक्त आयुष्य देण्यासाठी हे योगदाने महत्त्वपूर्ण ठरले आहे. सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये संपूर्ण देशभरातून तसेच परदेशातूनही अनेक रुग्णांना उपचारांसाठी येत असतात. आंतरराष्ट्रीय वैद्यकीय अहवालांनुसार, एमव्हीडी शस्त्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची असल्याने जगातील काही निवड आणि विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या केंद्रांमध्येच केली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा शस्त्रक्रियांचे प्रमाण केंद्रागणिक वेगळे असले तरीही यशस्वी कामगिरी आणि अचूकतेने होणारे काम हे केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या ठिकाणीच शक्य असते. सह्याद्री हॉस्पिटलने नमूद केले आहे की, हॉस्पिटलमध्ये दरवर्षी होणाऱ्या शस्त्रक्रियांचे प्रमाण आंतरराष्ट्रीय स्तरावरील सरासरीच्या तुलनेत लक्षणीयरित्या जास्त आहे. रुग्णाच्या उपचारांबाबतचा प्रत्येक निर्णय अत्यंत काळजीपूर्वक घेतला जातो. हा निर्णय वैयक्तिक स्तरावर पक्का केला जातो. रुग्णाची शारिरीक स्थिती, आजाराचे स्वरुप यांची सखोल वैद्यकीय तपासणी केली जाते. त्यानंतरच शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला जातो.

# वल्लभनगर बसस्थानकाची प्रताप सरनाईक यांची पाहणी

## “श्रमिक हो... घ्या इथे विश्रांती; हे केवळ सुभाषित नको, त्यानुसार उत्तम सुविधा द्या!” — परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

पुणे (दै. संध्या)

■ १ जूनपासून एसटीच्या सर्व उपहारगृहांत ४० रुपयांत चहा-नाश्ता

दमून-भागून आलेल्या चालक व वाहकांना योग्य विश्रांती मिळावी यासाठी त्यांच्या विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. स्वच्छतागृहे टापटीप व स्वच्छ ठेवावीत, कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी तसेच अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय करावी अशा घरगुती सुविधांची निर्मिती करावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष




प्रताप सरनाईक यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिले.

ते पुणे विभागातील वल्लभनगर बसस्थानकाला भेट दिली असता बोलत होते. “चालक-वाहक हा एसटीचा कणा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून तो दररोज राज्यातील सुमारे ५० ते ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. या कर्मचाऱ्यांना कर्तव्य पूर्ण झाल्यानंतर घरच्यासारख्या सुविधा मिळाल्यास ते अधिक उत्साहाने सेवा बजावतील,” असा मोलाचा सल्ला मंत्री सरनाईक यांनी दिला.

बसस्थानकाची पाहणी करताना त्यांनी अनेक वर्षे बंद असलेले व्यापारी गाळे महिला बचत गटांना व होतकरू उद्योजक तरुणांना अत्यल्प भाड्यात उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. यामुळे एसटी महामंडळाचा महसूल वाढेल तसेच प्रवासी व कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील, असे त्यांनी नमूद केले. महामार्गांवरील हॉटेल-मोटेलप्रमाणेच एसटी बसस्थानकांवरील उपहारगृहांमध्येही सर्व प्रवाशांना ४० रुपयांत चहा-नाश्ता देण्याची योजना १ जूनपासून सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केली.

या पाहणीदरम्यान खासदार श्रीरंग बारणे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

## ग्रामदैवत श्री कसबा गणपतीला चंदन उटी व पुष्प सजावट

पुणे (दै. संध्या)

वैशाख महिन्यानिमित्त ग्रामदैवत श्री कसबा गणपती मोरयाला चंदन उटी चा लेप लावून पूजा करण्यात आली. तसेच मोगरा, चाफा, जरबेरा, कमळ, गुलाब, जास्वंद, मांदार आदी फुलांची सजावट यावेळी करण्यात आली होती. मूळ रूपातील जयंती गजाननाचे स्वरूप डिसेंबर २०२५ मध्ये सर्व भाविकांसमोर आले. त्या प्रथमच अशा प्रकारचे चंदन उटी लेपन सोहळा करण्यात आला. यावेळी मंदिराचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार, विश्वस्त संगीता जयंता ठकार, मिहिर ठकार, आशापुरक ठकार उपस्थित होते. सध्या उन्हाच्या झळांनी सर्वत्र बिकट अवस्था होत आहे. त्यामुळे चंदन उटी म्हणजे शीतलतेचा प्रसाद आणि पूजेमध्ये वापरली गेलेली सुवासिक फुले म्हणजे भक्तीचा सुगंध असा दुहेरी योगाचा लाभ यानिमित्ताने भाविकांना घेता आला. श्री जयंती गजाननाचे डोळ्यांचे पारणे फेडणारे असे अतिशय मनमोहक रूप आणि पुष्प सजावट पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. उन्हाळ्यात थंडावा मिळावा आणि उष्णतेपासून शरीराचे संरक्षण व्हावे यासाठी चंदनाचा लेप लावला जातो. चंदन अतिशय शीतल आणि सुगंधी असल्यामुळे हा लेप लावून मोरयाला प्रसन्नता मिळते. चंदन लावणे हे देवाला प्रसन्न करण्यासाठी पवित्र पूजा मानली जाते. वे.मू. वसंत चिंतामणी फडके गुरुजी, श्री नृसिंह सरस्वती पाठशाळा आळंदी तर्फे मंदिरात सायंकाळी ऋग्वेदाच्या १४ घनपाठी ब्राह्मणांद्वारे घनाच्या ब्रह्मणस्पती सूक्त पठणाचे आयोजन केले होते.

## जिल्हा परिषद सदस्याची विकासात्मक दृष्टी ठरेल ग्रामविकासाला नवी चालना देणारी : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

पुणे (दै. संध्या)

ग्रामविकासामध्ये जिल्हा परिषद सदस्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून विकासात्मक दृष्टी ठेवून काम केले तर ग्रामविकासाला मोठी चालना मिळेल. त्यासाठी हे प्रशिक्षण मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान व राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा) यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा, पुणे येथे नुकतीच राज्यातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांसाठी तीन दिवसीय पायाभूत प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेच्या




उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

या कार्यशाळेच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर व पुणे जिल्ह्यातील एकूण ८५ जिल्हा परिषद सदस्य सहभागी झाले होते.

श्री. गोरे म्हणाले की, जिल्हा परिषदेमध्ये प्रभावीपणे काम करण्यासाठी सदस्यांना प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. ग्रामविकास विभागाच्या वतीने यशदा येथे नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना विविध विषयांवरील सखोल मार्गदर्शन देण्यात आले. या प्रशिक्षणाचा उपयोग करून सदस्यांनी आपल्या मतदारसंघात सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत सक्षमीकरण अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत असून प्रत्येक गाव समृद्ध करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषद पुणे चे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे, अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपमहासंचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी तसेच सत्र संचालक आनंद पुसावळे व शरदचंद्र माळी उपस्थित होते.

## टाटा प्ले कडून ‘कार्टून नेटवर्क फॉरेव्हर’चा विस्तार

### बालपणीचे लोकप्रिय कार्टून्स पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

पुणे (दै. संध्या)

तुमचे बालपण शाळेतून घरी पळत येऊन आपले आवडते कार्टून्स, विशेषतः प्रसिद्ध डीसी हिरोज पाहण्यात गेले असेल, तर ही बातमी खास तुमच्यासाठीच आहे. टाटा प्ले आपल्या कार्टून नेटवर्क फॉरेव्हर सेवेचा विस्तार करून ॲनिमेशनचे ते सुवर्णयुग पुन्हा घेऊन येत आहे. शाळेनंतरचा वेळ, वीकेंड मॅरेथॉन्स आणि मैदानावर रंगणाऱ्या गप्पा ज्यांच्यामुळे खास बनायच्या ते सर्व शोज आता पुन्हा पाहायला मिळणार आहेत. या एप्रिलपासून 'बॅटमॅन: द ॲनिमेटेड सिरीज'सह या प्लॅटफॉर्मवर डीसीच्या विश्वातील जुन्या आठवणींनी भरलेला प्रवास सुरू होत आहे.

हे सर्व फक्त या शोजच्या पुनरागमनामुळे खास नाही, तर त्यांच्याशी जोडलेल्या भावनांमुळे अधिक रोमांचक ठरत आहे. 'जस्टिस लीग'ला एकत्र येताना पाहण्याचा थरार, 'स्वॅट कॅट्स'ची आकाशातील झेप पाहून अंगावर येणारा काटा किंवा 'यंग जस्टिस'मधील साहसी प्रवास, हे फक्त कार्टून्स नव्हते, तर प्रत्येक घरातील सुंदर क्षण, सवयी आणि सामायिक आठवणींचा भाग होते.

२०२६ च्या उन्हाळ्यामध्ये टाटा प्ले आठवणींच्या या प्रवासाला




अधिक उत्साहवर्धक करणार आहे. यामध्ये सुपरहिरो ॲक्शन आणि काळजाला भिडणाऱ्या सर्वकालिक लोकप्रिय शोजचा समावेश असेल. 'टॉम अँड जेरी', 'स्कूबी-डू' आणि 'कोडनेम: किड्स नेक्स्ट डोअर' यांसारखे शोज कौटुंबिक जिव्हाळा निर्माण करतात. हे फक्त साध्या-सोप्या काळातील आठवणींना उजाळा देणे नसून त्या काळातील उत्कृष्ट कथा पुन्हा एकदा अनुभवण्याची संधी आहे.

हिंदी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांत २४x७ जाहिरातमुक्त उपलब्ध असलेले हे शोज टाटा प्लेची डीटीएच सेवा आणि टाटा प्ले मोबाईल ॲपवर सहज पाहता येतील. कामाच्या गडबडीत एखादा छोटा एपिसोड पाहणे असो किंवा रात्री उशिरापर्यंत जुन्या आठवणींत रमत कार्टून्स पाहणे, हे क्लासिक शोज आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत उत्साहाची भर करतात. टाटा प्ले कार्टून नेटवर्क फॉरेव्हर कंटेंट निर्माण करण्यासह एका भावनेची जोपासना करत आहे. हा प्लॅटफॉर्म आपल्याला अशा काळात परत घेऊन जातो, जिथे कथा अधिक भव्य वाटायच्या, हिरोज आपल्या जवळचे वाटायचे आणि मनोरंजन अत्यंत खास, साधे व सर्वांनी मिळून अनुभवण्यासारखे असायचे.

कारण, बालपणातील काही आवडत्या गोष्टी फक्त स्मरणातच राहत नाहीत, तर तुम्हाला त्यांची सर्वात जास्त गरज असते, तेव्हा त्या पुन्हा तुमच्या आयुष्यात परत येतात.

तुमचे आवडते हिरोज, त्यांची धमाल-मस्ती आणि बरेच काही अनुभवण्यासाठी पहा टाटा प्ले कार्टून नेटवर्क फॉरेव्हर, सर्व्हिस #653 वर. हे चॅनेल २४x७, हिंदी आणि इंग्रजी भाषेत विनाजाहिरात उपलब्ध आहे

## फोनपेने साध्य केला ५ कोटी नोंदणीकृत व्यापाऱ्यांचा टप्पा

पुणे (दै. संध्या)

28 एप्रिल 2026 पर्यंत फोनपेच्या प्लॅटफॉर्मवर आतापर्यंत एकूण 5 कोटी नोंदणीकृत व्यापाऱ्यांचा टप्पा पार झाल्याचे फोनपेने आज जाहीर केले. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सुरू असलेल्या डिजिटायझेशनमध्ये फोनपेची भूमिका अधोरेखित करणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. देशातील 98% पेक्षा अधिक पिनकोड्समध्ये व्यापाऱ्यांचे जाळे विस्तारल्यामुळे, पेमेंट स्वीकारण्याच्या सेवांपासून पुढे जात विकसनशील डिजिटल अर्थव्यवस्थेत स्पर्धा करण्यासाठी व्यवसायांना आवश्यक असलेल्या फोनपेने विस्तारलेल्या विविध व्यापारी सोल्यूशन्सच्या विस्ताराचे हे प्रतीक आहे. हा टप्पा गाठण्यामागे लहान व्यावसायिकांसाठी डिजिटल व्यवहारांची सुरुवात अधिक सुलभ करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्न हे शक्य झाल्याचे कंपनीने म्हटले आहे. QR कोडच्या माध्यमातून सुरुवात करत फोनपेने डिजिटल पेमेंट्स स्वीकारण्याशी संबंधित खर्च कमी करण्यावर भर दिला. ‘फोनपे बिझनेस’ ॲपमुळे व्यापाऱ्यांना व्यवहार आणि दैनंदिन कामकाज व्यवस्थापित करणे सोपे झाले असून कालांतराने कर्ज, स्मार्टस्पीकर्स आणि POS उपकरणांसारख्या इतर सेवांचा लाभ घेण्यासही त्यांना प्रोत्साहन




मिळाले. प्रत्यक्ष विक्री जाळे, चॅनेल पार्टनर एजंट्स आणि स्थानिक भाषांमधील सहाय्य यामुळे ही सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. या सातत्यपूर्ण विस्तारामुळे लाखो छोटे दुकानदार आणि किराणा व्यावसायिक केवळ रोख व्यवहारांवर अवलंबून राहण्यापासून पुढे येत औपचारिक डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी झाले आहेत. या टप्प्याबाबत प्रतिक्रिया देताना फोनपेच्या मर्चंट बिझनेस विभागाचे चीफ बिझनेस ऑफिसर युवराज सिंग शेखावत म्हणाले, “50 दशलक्ष व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचणे हा देशभरातील व्यापाऱ्यांसाठी आर्थिक सेवा अधिक सुलभ करण्याच्या आमच्या प्रयत्नांतील महत्त्वाचा टप्पा आहे. आमच्या अनेक भागीदारांसाठी हा प्रवास एका साध्या QR कोडपासून सुरू झाला, मात्र कालांतराने हे नाते अधिक मजबूत झाले आहे. आज डिजिटल पेमेंट्स हे कर्जासारख्या औपचारिक सेवांकडे जाण्याचे प्रवेशद्वार ठरत आहेत.

# ‘नाथजलचे थंडगार पाणी १५ रुपयांलाच मिळाले पाहिजे!’

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक : लोणावळा बसस्थानकाची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पाहणी

पुणे (दै. संध्या)

उन्हाळ्यात बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना ‘नाथजल’चे थंडगार पाणी केवळ १५ रुपयांना मिळाले पाहिजे. किंमत वाढवून विक्री करताना आढळल्यास संबंधितांचा विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला.

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज सकाळी पुणे विभागातील




लोणावळा बसस्थानकास भेट देऊन तेथील प्रवासी सेवा-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रवाशांशी संवाद साधला असता, बसस्थानकावर विक्री होत असलेली ‘नाथजल’ची एक लिटरची थंड पाण्याची बाटली २० रुपयांच्या वाढीव दराने विकली जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावर त्यांनी संबंधित विक्रेत्यास स्पष्ट दरफलक लावण्याच्या सूचना देत, पुढे १५ रुपयांची बाटली अधिक दराने विक्री केल्यास विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा दिला.

तसेच, लोणावळा बसस्थानकावर येणाऱ्या काही बसफेऱ्या बसस्थानकात न येता पुढे जात असल्याची तसेच काही बसेस जाणीवपूर्वक खाजगी हॉटेलांवर थांबत असल्याची तक्रार प्रवाशांनी यावेळी मांडली. या हॉटेलांवरील महागडे खाद्यपदार्थ प्रवाशांना परवडत नसल्यामुळे, वेळापत्रकातील सर्व बसफेऱ्या नाश्त्यासाठी लोणावळा बसस्थानकावरच थांबाव्यात, अशी मागणी प्रवाशांनी केली. त्यानुसार, कोणतीही बस खाजगी हॉटेलांवर न थांबता नियोजित वेळापत्रकानुसार लोणावळा बसस्थानकावरच थांबावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी एसटी प्रशासनाला दिले.

या पाहणीदरम्यान त्यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, तिकीट व्यवस्था तसेच इतर मूलभूत सोयींचा सविस्तर आढावा घेतला. प्रवाशांना अधिक दर्जेदार व सुलभ सेवा मिळावी यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी त्यांनी बसस्थानकातील कर्मचाऱ्यांशी तसेच प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रवासी सेवेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# दुर्लक्षित जेष्ठ कलाकारांसाठी CAWTचे कार्य कौतुकास्पद

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

अभिनय क्षेत्रातील दिग्गज कलाकारांना आपण सिनेमाच्या रुपेरी पडद्यावर पाहतो. या क्षेत्रात मिळणारा पैसा व माया यांची चर्चा आपण ऐकतो. पण प्रसिद्धीच्या पडद्याबाहेर गेल्यावर त्या कलाकारांच्या आयुष्यामध्ये किती दुःख असते ते आपल्याला कधीही दिसत नाही. अशा या जेष्ठ कलाकारांसाठी दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख यांसारख्या कलाकारांनी एकत्र येऊन जेष्ठ कलाकारांचे दुःख, त्यांच्या गरजा, त्यांचे आजारपण यांसारख्या समस्या सोडवण्यासाठी CAWT सारखा एक मंच तयार केला असून या संस्थेतर्फे केले जाणारे




## सावंतवाडीत एक एकर जागा देणार – रविंद्र चव्हाण

काम अतिशय कौतुकास्पद आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबईत केले. सिने आर्टिस्ट वेलफेअर ट्रस्ट (CAWT) आणि सिने अँड टीव्ही आर्टिस्ट असोसिएशनच्या वतीने CAWT च्या स्थापनेत आणि CINTAA - CAWT टॉवरच्या उभारणीत ज्या विश्वस्थ कलाकारांनी आपले अमूल्य योगदान दिले, त्यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेते दिलीप कुमार, सुनील दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॉनी लिव्हर, आशा पारेख, अमरीश पुरी, अमजद खान, चंद्रशेखर वैद्य, दारासिंह या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी त्या कलाकारांचे फोटो आणि माहिती देणाऱ्या फलकाचे उद्‌घाटन आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळेस ते बोलत होते.

रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अभिनय क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराचा एक प्रसिद्धीचा काळ असतो. तो चांगला काळ ओसरला कि सरत्या काळात त्या कलाकारांकडे कुणी पाहत नाही. त्यांची कुणी चौकशी करत नाहीत. असे जवळपास ९ ते १० हजार कलाकार सध्या अभिनय क्षेत्रात आहेत. अशा कलाकारांचे दैनंदिन जीवन अतिशय हलाखीचे असते. यामध्ये अभिनय क्षेत्रात काम करणारे इतर कामगार यांची संख्या देखील मोठी आहे. यांना सामाजिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, अशी माहिती मला CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू यांनी आज दिली. या सर्व समस्यांचे निराकरण करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच CAWT ला जेष्ठ कलाकारांकरिता मी कोकणातील केसरी, सावंतवाडी येथील माझी स्वतःची एक एकर जागा देण्यास तयार आहे, असे रविंद्र चव्हाण म्हणाले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रविंद्र चव्हाण यांच्या सोबत जेष्ठ अभिनेत्री व CAWT च्या अध्यक्षा प्रीती सप्रू, ट्रस्टच्या सचिव अभिनेत्री संभावना सेठ, संस्थेचे खजिनदार अभिनेते दीपक पराशर, बॉलिवूड अभिनेते राजपाल यादव, मनोज जोशी, मुकेश ऋषी, आयुब खान, अभिनेत्री कुनिका आणि सिने व टीव्ही क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात रंगला "कला सिद्धी"नृत्यालयाचा वर्धापन सोहळा

सासवड (दैनिक संध्या) : दोन दिवसीय भव्य नटराज करंडक नृत्यस्पर्धा, विविध प्रकारच्या नृत्यांचा सादर केलेला नृत्याविष्कार, पुणे येथील अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सदस्य तसेच नटरंग अकादमीचे कार्याध्यक्ष , नृत्यदिग्दर्शक जतीन पांडे यांचा कलासिद्धी पुरस्कार देऊन केलेला सन्मान, नुकताच देशाच्या सीमेवर लढताना शहिद झालेला पुरंदरचा सुपुत्र , वीर जवान घनश्याम आढळगे यांना अर्पण केलेली श्रद्धांजली,सासवडसह पुरंदर तालुक्यातून उपस्थित राहिलेले नृत्य रसिक, सुंदर मांडणी ,समायोचित निवेदन, काही मान्यवरांची मनोगते या स्वरूपातील सासवड येथील कलासिद्धी नृत्यालयाचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात मोठ्या उत्साहात पार पडला. माजी नगरसेविका विद्या टिळेकर, ममता बालसदन च्या सुजाता गायकवाड, मणिकर्णिका ग्रुपच्या मनिषा राऊत जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले, स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, उद्योजक दिनेश पांढरे कुमुदिनी पांढरे, सुजाता गुरव, पल्लवी देशमुख अश्विनी पांडे व कला सिद्धीच्या संस्थापिका धनश्री लोमटे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. नटराज पूजन करून व श्री गणेशाच्या नृत्यमय आरतीने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.संस्थापिका धनश्री लोमटे यांनी प्रास्तविक करून संस्थेच्या कार्याचा प्रवास मांडला. श्रीशा लोमटे यांनी आभार मानले. किशोरी पवार व स्वानंद लोमटे यांनी सुंदर मांडणी करत केलेले सूत्रसंचालन कार्यक्रमाच्या जमेच्या बाजू ठरल्या. जतिन पांडे, संतोष जगताप, विद्या टिळेकर , मनिषा राऊत , सुजाता गुरव व हेमंत ताकवले यांनी मनोगतातून संस्थेला शुभेच्छा देत सर्व नृत्यांगनांचे कौतुक केले. संस्थेच्या ७० विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात विविध नृत्य प्रकार सादर करून उपस्थितांच्या टाळ्या घेतल्या. तिल्हाना, वर्णम, देवीचा गोंधळ, पाश्च्यात्य नृत्य, गरबा, हिपहॉप, तसेच बाजीप्रभू देशपांडे यांच्यावरील नृत्य आदी रचना यावेळी सादर करण्यात आल्या.मनषा जगताप, वैष्णवी रासकर, रितुशा झगडे, रमा जेधे, सलोनी झेंडे, वैभवी पराडकर, सपना पवार, युगंधरा खालकर, कमलेश सुतार आदींनी कार्यक्रमाचे देखणे आयोजन केले.

### बँकेचे शाखा व्यवस्थापक ते वेल्थ बिल्डर वसंत कुटे यांचा यशस्वी प्रवास



पुणे (दैनिक संध्या) : बदलत्या आर्थिक सेवा क्षेत्रात यशस्वी प्रवासासाठी अनुभव, शिस्त आणि एका भक्कम संस्थात्मक प्लॅटफॉर्मची जोड आवश्यक असते. उद्योगातील अनुभव आणि योग्य 'इकोसिस्टीम'च्या मदतीने एक शाश्वत आणि विस्तारक्षम आर्थिक सेवा व्यवसाय कसा उभारता येतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'एनजे वेल्थ'चे पार्टनर वसंत कुटे यांचा प्रवास होय. म्युच्युअल फंड वितरक म्हणून काम सुरू करण्यापूर्वी वसंत कुटे यांनी कॉसमॉस बँक आणि सारस्वत बँक आदी नामांकित बँकांमध्ये अनेक वर्षे सेवा दिली. शाखा व्यवस्थापक आणि वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून काम करताना त्यांना आर्थिक उत्पादने, ग्राहक संवाद आणि शिस्तबद्ध संपत्ती संचय याचे सखोल ज्ञान मिळाले. याच कौशल्यांनी त्यांच्या उद्योजकीय प्रवासाचा पाया रचला. जानेवारी २०१८ मध्ये कुटे यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. आपली बँकिंग क्षेत्रातील कारकिर्द सोडून त्यांनी स्वतंत्र व्यवसाय उभारण्यासाठी 'एनजे वेल्थ'शी भागीदारी केली. हा निर्णय त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. आज ते १४० कोटी रुपयांच्या मालमत्तेचे (एयूएम) व्यवस्थापन करीत असून, देशभरातील दोन हजारांहून अधिक ग्राहकांना सेवा देत आहेत. त्यांचे बहुतांश ग्राहक महाराष्ट्रातील (पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, नंदुरबार आणि नागपूर) असले, तरी कोलकाता, चेन्नई आणि दिल्ली यांसारख्या शहरांतही त्यांचे जाळे विस्तारलेले आहे. विशेष म्हणजे, त्यांचे सुमारे ८० टक्के ग्राहक त्यांना कधीही प्रत्यक्ष भेटलेले नाहीत. हे डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाचे निदर्शक आहे. गुंतवणूकदार शिक्षण हा त्यांच्या कार्यपद्धतीचा मुख्य भाग आहे. नियमित सेमिनार आणि ऑनलाइन सत्रांच्या माध्यमातून ते महागाई, आपत्कालीन निधी आणि दीर्घकालीन शिस्तबद्ध गुंतवणुकीसारख्या संकल्पनांवर भर देतात. 'एनजे वेल्थ'चे तंत्रज्ञान, संशोधन आणि भागीदार यंत्रणेच्या बळावर, वसंत कुटे यांचा प्रवास हे सिद्ध करतो, की योग्य प्लॅटफॉर्म मिळाल्यास अनुभवाचे रूपांतर शाश्वत प्रगतीत होऊ शकते.

### राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार ठरला

मुंबई (दैनिक संध्या) : विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या कोट्यातील एका जागेचा पेच सुटला आहे. पक्षाचे तरुण नेतृत्व माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींकडून घेण्यात आला आहे. काल रात्री उशिरापर्यंत चाललेली कोअर कमिटीची बैठक आणि त्यानंतर वरिष्ठ नेत्यांच्या चर्चेनंतर झिशान सिद्दीकी यांच्या नावावर शिक्का मोर्तब करण्यात आले, तसेच आज सकाळी त्यांनी आपला उमेदवारी अर्जही दाखल केला. अनेक वर्षाची काँग्रेसची साथ सोडून अजित पवारांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन दिवंगत बाबा सिद्दीकी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यांच्या निधनानंतर सिद्दीकी कुटुंबाचा राजकीय वारसदार म्हणून झिशान सिद्दीकी जबाबदारी सांभाळत आहेत.

## विधान परिषद निवडणूक बिनविरोध होणार

**मुंबई (दै. संध्या) :**

विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवशी राजकीय वर्तुळात बऱ्याच घडामोडींना वेग आल्ला दिसून आले. भाजपने काल आपल्या कोट्यातील ५ जागा अगोदरच घोषित केल्या. शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे उमेदवार निश्चिती करीता विलंब लागल्याने घडामोडींना वेग आला. तर उद्धव ठाकरे यांच्या ऐवजी अंबादास दानवे यांचे नाव घोषित झाल्याने काँग्रेसमध्ये हालचाली वाढल्या होत्या. विधान परिषदेच्या ९ जागासाठी निवडणूक होत आहे. या जागासाठी ९ उमेदवारांनी अखेरच्या दिवशी अर्ज दाखल केल्याने निवडणूक बिनविरोध होणार हे निश्चित आहे. विधानसभेतील पक्षीय संख्याबळा नूसार पाच जागा या भाजप, शिंदेसेना दोन, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि ठाकरेसेना प्रत्येकी एका उमेदवाराने अर्ज दाखल केल्यामुळे आता ही निवडणूक बिनविरोध होणार आहे. भाजपकडून अतिरिक्त उमेदवार देण्याची शक्यता होती, मात्र तो दिला नाही त्यामुळे या निवडणुकीसाठी ९ उमेदवार रिंगणात आहेत. विधान परिषद निवडणुकीसाठी ठाकरेसेनेकडून उद्धव ठाकरे यांचं नाव देखील चर्चेत होतं. जर उद्धव ठाकरे निवडणूक लढवणार असतील तर आम्ही उमेदवार देणार नाही, अशी काँग्रेसची भूमिका होती.

## वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त नेटफ्लिक्सच्या कपिल शोचा खास एपिसोड

### समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया एकत्र येऊन जबरदस्त धमाका करतील

**मुंबई (दै. संध्या) :**

काही क्षण ट्रेंड होतात आणि काही "मस्ट वॉच" बनतात, आणि हा एपिसोड त्यापैकीच एक आहे जो पूर्णपणे हसण्याने भरलेला आहे. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त नेटफ्लिक्स कॉमेडीला खास बनवत द ग्रेट इंडियन कपिल शो (TGIKS) चा एक स्पेशल एपिसोड घेऊन येत आहे. या एपिसोडमध्ये कॉमेडीचे बादशाह कपिल शर्मा यांच्यासोबत नव्या पिढीतील कलाकार समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील दिसणार आहेत. हा एक मजेदार क्रॉसओव्हर आहे, ज्यामध्ये जोक्स आणि सतत हसवणारे क्षण पाहायला मिळणार आहे. याबाबत कपिल शर्मा म्हणाला, "आमच्या शो ला प्रेक्षकांकडून मिळणारे प्रेम




हे आम्हाला नेहमी काहीतरी नवीन आणि मजेदार कंटेंट बनवण्यासाठी प्रेरणा देते. वर्ल्ड लाफ्टर डे निमित्त आम्ही नेटफ्लिक्ससोबत मिळून एक खास एपिसोड तयार केला आहे, जो खूप मजेदार आणि भरपूर हसवणारा आहे. या एपिसोडमध्ये समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया देखील त्यांच्या खास स्टाईलमध्ये सहभागी होत आहेत, ज्यामुळे शो आणखी खास होणार आहे. आमचा उद्देश फक्त एवढाच आहे की लोकांनी आमच्यासोबत हसत-हसत आनंदाने हा दिवस साजरा करावा." जसजशी चर्चा अधिक रंजक होत जाते, तसा स्टेज अचानक टीजीआयकेएस न्यूज डिबेटमध्ये बदलतो. ज्यात सुनील ग्रोवर मुख्य भूमिकेत दिसतो. त्यानंतर नेहमीप्रमाणे टीजीआयकेएसच्या खास स्टाईलमध्ये कृष्णा अभिषेक 'मोना' आणि किकू शारदा 'सोना'च्या भूमिकेत एंट्री करतात. दोघे मिळून संपूर्ण शो ला शेवटपर्यंत हसण्याने आणि धमाल मजेशीर वातावरणाने भरून टाकतात. वेगवेगळ्या कलाकारांची खास स्टाईल आणि टीजीआयकेएसची धमाल कॉमेडी एकत्र येऊन हा स्पेशल एपिसोड वर्ल्ड लाफ्टर डे साजरा करण्यासाठी अगदी परफेक्ट ठरतो, जिथे प्रत्येक क्षण हसण्याने भरलेला असतो. द ग्रेट इंडियन कपिल शो चा हा स्पेशल एपिसोड 2 मे रोजी फक्त नेटफ्लिक्सवर पाहायला मिळेल.

## आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या प्रगत-अद्ययावत ऑटोमोटिव स्टील प्रॉडक्शन लाइनचे जपानच्या राजदूताच्या हस्ते उद्‌घाटन

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाने (एएम/एनएस इंडिया) आज गुजरातच्या हाजिरा येथील कंपनीच्या प्रमुख प्रकल्पात,भारतातील जपानचे राजदूत सन्माननीय (or राजमान्य राजश्री) श्री. केइची ओनो यांच्या हस्ते प्रगत पिक्लिंग लाइन आणि टँडम कोल्ड मिल (PLTCM) चे उद्‌घाटन करण्याची घोषणा केली.

प्रति वर्ष 2 दशलक्ष (or 20 लाख) टन्सची क्षमता असलेल्या प्रगत-अद्ययावत PLTCM चे उद्‌घाटन AM/NS इंडियाच्या ऑटोमेटिव उत्पादन क्षमतेमध्ये महत्वाची भर म्हणून करण्यात आले आहे आणि लवकरच उच्च-प्रतीच्या, कोल्ड-रोल्ड बेस स्टीलच्या उत्पादनासाठी ही सुसज्ज होईल, ज्याचा उपयोग तत्सम प्रकारच्या पहिल्या, तसेच जनक (or मूळ) कंपन्या आर्सेलॉर मित्तल आणि निप्पॉन स्टील द्वारा पेटंटप्राप्त स्टील सोल्यूशन्ससह जागतिक-दर्जाच्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी केला जाईल. ही नवीन लाइन ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या वाढत्या गरजांच्या पूर्ततेसाठी ॲडव्हान्स्ड हाय स्ट्रेंथ स्टील (AHSS) च्या



उत्पादनात भारताला पूर्णपणे आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. भारतातील अत्यंत प्रगत प्रॉडक्शन लाइन्समध्ये , ह्या सुविधेत (or फॅसिलिटीत) जनक (or मूळ) कंपन्यांच्या सखोल नैपुण्यावर आधारित तांत्रिक प्रगत-अद्ययावत प्रक्रिया तंत्रज्ञान, उत्कृष्ट स्वयंचलन (or ऑटोमेशन ) आणि जागतिक मापदंड प्रमाणित गुणवत्ता प्रणाली ह्यांचे संकलन आहे.

ही सुविधा (or फॅसिलिटी) ॲडव्हान्स्ड हाय स्ट्रेंथ स्टील (AHSS), गॅल्व्हॅनील्ड (GA), गॅल्व्हनाइज्ड (GI) आणि प्रेस हार्डन्ड स्टील (PHS) ॲप्लिकेशन्ससाठी प्रगत ऑटोमोटिव्ह स्टीलच्या उत्पादनाला पाठबळ पुरवण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामुळे तिला देशातील अन्य मिल्सच्या तुलनेत वरचष्मा लाभतो आणि ती सर्व ऑटोमोटिव्ह कंपन्यांना एंड-टू-एंड सोल्यूशन्स प्रदान करते. ही सोल्यूशन्स टिकाऊपणाच्या जागतिक मानकांची पूर्तता करण्यासाठी, सुधारित कार्यक्षमता आणि कामगिरीसाठी वाहनांचे वजन कमी करण्यास सक्षम बनवण्यासाठी, आणि भारत NCAP (BNCAP) मानकांच्या अनुसार सुरक्षितता वाढवण्यासाठी डिझाइन केलेली आहेत. ही समर्पित ऑटोमोटिव लाइन आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या डाउनस्ट्रीम क्षमतांना लक्षणीय स्वरूपात मजबूत बनवेल, जागतिक मानकांशी मिळत्याजुळत्या घडवेल आणि 1180 MPa पर्यंत सामर्थ्याच्या पातळ्यांसह AHSS च्या उत्पादनाला पाठबळ पुरवेल.

हे उद्‌घाटन गुजरातमधील, हाजिरा येथील AM/NS इंडियाच्या मुख्य प्लांटमध्ये अपस्ट्रीम, डाउनस्ट्रीम आणि अन्य सुविधांचा विकास करण्यासाठी सुरू असलेल्या ₹60,000-कोटींच्या विस्तार प्रकल्पाचा एक भाग आहे.

भारतातील जपानचे राजदूत सन्माननीय (or राजमान्य राजश्री) श्री. केइची ओनो, ह्यांनी परिचालनाचे प्रमाण आणि वाढीचे मार्गक्रमण ह्यांचे प्रत्यक्ष आकलन करून घेण्यासाठी प्लांटचा दौरा केला. भारतातील जपानचे राजदूत सन्माननीय(or राजमान्य राजश्री) श्री.केइची ओनो म्हणाले की AM/NS इंडियाने हाजिरा प्लांटमध्ये प्रगत-अद्ययावत ऑटोमोटिव स्टील शीट प्रॉडक्शन लाइन मध्ये उत्पादन सुरू केल्याची घोषणा केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. भारतामध्ये हाय-एंड स्टील प्रॉडक्टचे उत्पादन सुरू करण्यात जपानच्या प्रगत तंत्रज्ञानाचे लक्षणीय योगदान आहे. ह्यामधून " मेक इन इंडिया,मेक फॉर द वर्ल्ड"उपक्रमाने नवीन टप्प्यामध्ये पदार्पण करण्यात जपानचे योगदान स्पष्टपणे दिसून येते. जपान आणि भारत ह्यांचे संबंध हे पररस्परांना पूरक ठरणारे आहेत, ज्यामध्ये जपानचे तंत्रज्ञान आणि भांडवल ह्यांना भारताची उत्पादन क्षमता आणि वाढत्या मागणीची जोड मिळते. हाजिरा स्टील प्लांटमधील चैतन्याचा प्रत्यक्ष साक्षीदार असल्यामुळे, मला असा आत्मविश्वास वाटतो की जपान आणि भारत ह्यांच्यातील औद्योगिक सहकार्य तसेच विकसित भारताचे भवितव्य हे खात्रीने उज्ज्वल असेल"

श्री. दिलिप ऊमेन, आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाचे (AM/NS इंडिया) चीफ एक्झिक्युटिव ऑफिसर म्हणाले: "आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांना ठामपणे बांधील आहे. ह्या बांधीलकीच्या अनुषंगाने आणि ' स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्युचर्स' ह्या आमच्या ब्रँडच्या वचनाच्या अनुसार, आर्सेलॉर मित्तल आणि निप्पॉन स्टील- ह्या सर्वोत्तम ऑटोमोटिव सोल्यूशन देण्यासाठी जागतिक पातळीवर नावाजलेल्या आमच्या दोन्ही जनक कंपन्यांचे अतुलनीय तंत्रज्ञान आणि नैपुण्य ह्यांची सांगड घालून आम्ही स्टीलमेकिंगची प्रगत-अद्ययावत मालमत्ता उभारत (or उदयाला आणत) आहोत. पिक्लिंग लाइन आणि टँडम कोल्ड मिल (PLTCM) चे उद्‌घाटन, उच्च-गुणवत्तेचे, उच्च- दर्जाचे ऑटोमेटिव स्टील्स स्थानिक पातळीवर उत्पादन करण्यासाठी पायाची उभारणी करून ह्या वाटचालीतील महत्वाचा लक्षणीय टप्पा म्हणून उदयाला येत आहे. ही आयातीला पर्याय निर्माण करून पाठबळ देईल, पुरवठा श्रृंखलेची लवचीकता वाढवेल आणि ऑटोमोटिव उद्योगामध्ये अधिक सुरक्षित, अधिक हलकीफुलकी आणि अधिक टिकाऊ मोबिलिटी सोल्यूशन्स स्वरूपाचे परिवर्तन घडवण्यासाठी सक्षम बनवेल. ह्यामुळे नेक्स्ट-जनरेशन वेहिकल्स आणि जागतिक ऑटोमोटिव स्टँडर्ड्सच्या गरजांशी सुसंगत ठरणारे स्पर्धाक्षम उत्पादन करणारे मोहोळ म्हणून भारताचे स्थान मजबूत होईल. हे नव्याने उदयाला येणारे युनिट भारतातील उच्च-गुणवत्तेच्या, मूल्य-वर्धित ऑटोमोटिव स्टीलसाठी असलेल्या वाढत्या मागणीच्या पूर्ततेसाठी योगदान देईल, जी सध्या फ्लॅट स्टीलसाठी 7.8 दशलक्ष टन्स प्रति वर्ष (MTPA) आहे आणि जिच्यात 6-7% वार्षिक वाढ होणे अभिप्रेत आहे.

## संतूर शॉवर जेलने चंदनाच्या सुगंधाला नवीन रूप देत 'सँडलवूड का रिमिक्स' मोहीम सुरू केली

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

विप्रो कंझ्युमर केअर अँड लायटिंगच्या संतूर पोर्टफोलिओचा भाग असलेल्या संतूर शॉवर जेलने, अभिनेत्री श्रीलीला हिला नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले आहे. यासोबतच कंपनीने 'सँडलवूड का रिमिक्स' ही नवीन टीव्ही जाहिरात मोहीम सुरू केली आहे.

संतूर शॉवर जेलने आपल्या पारंपरिक चंदन घटकाला नवीन लिक्विड बॉडी वॉशच्या स्वरूपात सादर केले आहे. हे उत्पादन रोजच्या वापरासाठी योग्य आहे. यात चंदन आणि गार्डेनिया फुलांचे अर्क मिसळले आहेत, जे त्वचेला मऊ ठेवण्यास आणि नैसर्गिक चमक वाढवण्यास मदत करते. हे शॉवर जेल सौम्य आणि pH संतुलित असल्याने ते दररोज सुरक्षितपणे वापरता येते.



या संकल्पनेला अधिक आकर्षक बनवण्यासाठी ब्रँडने 'सँडलवूड का रिमिक्स' ही मोहीम सुरू केली आहे, या मोहिमेत पारंपरिक चंदनाला नव्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. या मोहिमेचा भाग म्हणून अभिनेत्री श्रीलीला हिला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवडण्यात आले आहे, जी परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम उत्तम प्रकारे दाखवते.

या मोहिमेबाबत विप्रो कंझ्युमर केअर अँड लायटिंगच्या सीनिअर व्हाइस प्रेसिडेंट – मार्केटिंग, एस. प्रसन्ना राय म्हणाले, "चंदन हा नेहमीच संतूर ब्रँडचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. संतूर शॉवर जेलच्या माध्यमातून, आम्ही या पारंपरिक घटकाला आजच्या ग्राहकांसाठी उपयुक्त अशा नव्या स्वरूपात सादर करत आहोत. या टप्प्यावर परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम दर्शवणाऱ्या व्यक्तीसोबत भागीदारी करणे महत्त्वाचे होते. त्यामुळे आम्ही अभिनेत्री श्रीलीला हिची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड केली आहे. तिच्या उत्साही आणि आधुनिक व्यक्तिमत्त्वामुळे ती ब्रँडशी आणि ग्राहकांशी सहज जोडली जाते."

या सहकार्याबद्दल बोलताना अभिनेत्री श्रीलीला म्हणाली, "माझ्यासाठी चंदन नेहमीच सौंदर्य आणि त्वचेच्या काळजीचे प्रतीक राहिले आहे. संतूर सँडलवुड ब्युटी वॉशने या पारंपरिक घटकाला आधुनिक रूप दिले आहे, ते मला खूप आवडले. 'सँडलवूड का रिमिक्स' ही कल्पना माझ्या पिढीशी जोडलेली वाटते, कारण ती परंपरा आणि नवीन विचारांचा सुंदर संगम दाखवते. संतूर शॉवर जेलची ब्रँड ॲम्बेसेडर बनून या प्रवासाचा भाग होण्याचा मला आनंद आहे."

ही मोहीम बेट्स बंगळूर संकल्पित केली आहे. जुनी गाणी जशी नव्या रूपात सादर केली जातात, तसेच या मोहिमेत चंदन या पारंपरिक घटकाला आधुनिक बॉडी वॉशच्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. ही मोहीम टेलिव्हिजन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रसारित केली जाणार आहे. संतूर शॉवर जेल श्रेणीमध्ये केशर आणि झेंडू तसेच लिंबू आणि चाफा असे विविध प्रकार उपलब्ध आहेत. संतूर शॉवर जेल 250 मिली पॅकची किंमत 135 रुपये असून ती सर्व रिटेल दुकानांमध्ये आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.


## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ०४/०५/२०२६ ते दि. १३/०५/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. ०४/०५/२०२६ ते दि. १३/०५/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १४/०५/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2026/10 | विद्युत | पुणे महानगरपालिकेचे मुंढवा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्रोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा मिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | रू. ६०७९/- | रू. ५६१५८५४/- | रू. ५६१५९/- | ६ | Vaibhav Govind Ghule ७४४७४७२४१३ |
| PMC/ELECTRICAL/ 2026/11 | विद्युत | पुणे महानगरपालिकेचे खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्रोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | रू. ६०७९/- | रू. ५६१५८५४/- | रू. ५६१५९/- | ६ | Vaibhav Govind Ghule ७४४७४७२४१३ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Yogesh Mali
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्र. २/७७ दि. ३०/०४/२०२६*

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाला 'स्व. अजितदादा पवार' यांचे नाव देण्याची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाला स्वर्गीय अजितदादा पवार यांचे नाव देण्याची भावनिक मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी राज्य सरकारकडे केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना निवेदन पाठवले आहे. दिपक खैरनार यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खंडाळा घाटातील वाहतूक कोंडी आणि वारंवार होणाऱ्या अपघातांवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून उभा राहिलेला ‘मिसिंग लिंक’ प्रकल्प ०१ मे २०२६ रोजी कार्यान्वित होत असून, हा महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाचा क्षण मानला जात आहे. या प्रकल्पामुळे प्रवास सुमारे ०६ किमीने कमी होणार असून, तब्बल अर्धा तास वेळ वाचणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारलेला जगातील सर्वात रुंद बोगदा आणि भारतातील सर्वात उंच पूल ही या प्रकल्पाची खास वैशिष्ट्ये आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या संकल्पनेपासून ते अंमलबजावणीपर्यंत स्व. अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री म्हणून निर्णायक भूमिका बजावली होती. विशेषतः २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात त्यांनी निधीची तरतूद करून प्रकल्पाला गती दिली होती. त्यांच्या दूरदृष्टी आणि प्रशासनिक क्षमतेमुळेच प्रकल्पाच्या कामांना वेग मिळाला, असेही त्यांनी स्पष्ट केले. “सामान्य जनतेचा प्रवास सुरक्षित, वेगवान आणि सुलभ व्हावा, हीच अजितदादांची भूमिका होती. ‘मिसिंग लिंक’ हा त्यांच्या कार्याचा जिवंत पुरावा आहे. त्यामुळे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या प्रकल्पाला त्यांचे नाव देणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल,” असे खैरनार यांनी म्हटले आहे. दरम्यान, या मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### संभाजी बारणे यांची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद




पिंपरी (दैनिक संध्या) : साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रा बरोबरच विविध क्षेत्रात मुशाफिरी करणारे थेरगावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संभाजी बाळासाहेब बारणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर विविध लेखकांनी लिहिलेल्या, विविध ९ भाषेतील ५५१ पुस्तकांचा संग्रह जमा केला आहे. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड, तमिळ, तेलगू, गुजराती आणि सिंधी भाषेतील पुस्तकांचा समावेश आहे. संभाजी बारणे यांच्या या पुस्तक संग्रहाची “इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड” मध्ये यथोचित नोंद करण्यात आली आहे. तसे प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह नुकतेच बारणे यांना इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या समितीच्या वतीने २५ मार्च २०२६ रोजी प्रदान करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित अशा प्रकारचा पुस्तक संग्रह करणारे संभाजी बारणे हे एकमेव आहेत असा दावा त्यांनी केला आहे. त्यांच्या विक्रमाची नोंद राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आल्यामुळे सर्व शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संभाजी बारणे हे पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव येथील उच्चशिक्षित रहिवाशी असून शेती व बांधकाम व्यवसाय करतात. त्यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध धातूंमधील विविध आकारांच्या ७० पेक्षा जास्त मूर्ती देखील आहेत. केंद्र सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांवर काढलेल्या दोन रुपयांच्या दीड हजार नाण्यांचा संग्रह देखील त्यांनी केला आहे. ही पुस्तके आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती, नाणी नागरिकांना पाहण्यासाठी त्यांच्या थेरगाव येथील कार्यालयात रोज सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत उपलब्ध आहेत. थेरगाव गावठाण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्ध पुतळा लोकवर्गणीतून उभारण्यासाठी बारणे यांनी पुढाकार घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांवर संशोधन करणाऱ्या व्यक्तींना ही पुस्तके वाचण्यासाठी व संदर्भ साठी मोफत उपलब्ध करून देत असल्याचेही संभाजी बारणे यांनी सांगितले.

### पिंपळे गुरवमध्ये बेकायदेशीर फ्लेक्सचा सुळसुळाट

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : परिसरातील सृष्टी चौक, कल्पतरू सिग्नल परिसर तसेच राजमाता जिजाऊ उद्यान चौक येथे शाळा व खासगी क्लासेसच्या बेकायदेशीर जाहिरातींचा अक्षरशः सुळसुळाट झाल्याचे चित्र समोर आले आहे. सिग्नलच्या खांबांवर, रस्त्यांच्याकडेला आणि सार्वजनिक ठिकाणी नियम धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणात फ्लेक्स लावण्यात आल्याने शहराचे विद्रूपीकरण होत असून, नागरिकांमध्ये तीव नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, सृष्टी चौक हा वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत गजबजलेला आणि संवेदनशील भाग आहे. या ठिकाणी सिग्नल असतानाही शेजारील खांबांवर जाहिरातींचे फलक लावले गेल्याने वाहनचालकांचे लक्ष विचलित होत आहे. सिग्नल स्पष्ट दिसण्यात अडथळे निर्माण होत असून, वळण घेताना समोरील वाहनांचा अंदाज न आल्याने अपघाताचा धोका वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शाळांना सध्या सुट्या असतानाच नवीन बॅचेसच्या नावाखाली क्लासेसचे शहरभर पेव फुटले आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सार्वजनिक मालमत्ता आणि सिग्नलच्या खांबांचा वापर करून हे फलक उभारले जात असल्याने नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट दिसते. शाळांना सुट्ट्या लागताच क्लासेसच्या जाहिरातींचा अक्षरशः पूर आला आहे. प्रशासनाकडून कोणतीही परवानगी न घेता हे फलक लावले जात आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

# स्थायी समिती सभेत विविध विकासकामांना मंजुरी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली.

यावेळी स्थायी समिती सदस्यांसह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर व्हीटीएम यंत्रणा बसविणे तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती करणे या कामास मंजुरी देण्यात आली. जुनी सांगवी परिसरातील रुग्णालयाच्या स्थापत्य दुरुस्ती व अनुषंगिक कामांस मान्यता देण्यात आली. भारत/महाराष्ट्र स्वच्छता अभियानांतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात आरोग्य विभागामार्फत स्वच्छता मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक खर्चास मंजुरी देण्यात आली. पुणे-बंगळुरू महामार्गाच्या पश्चिमेकडील वाकड, पुनावळे, ताथवडे व इतर भागांमध्ये पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती करणे, आवश्यकतेनुसार नवीन लाईन टाकणे व स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २९ पिंपळेगुरव येथील घाटावर स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र. २६ कस्पटे वस्ती, वेणूनगर, कावेरीनगर व इतर परिसरांमध्ये फुटपाथ, पेव्हिंग ब्लॉकची देखभाल व दुरुस्ती तसेच स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली.



स्थायी समिती बैठकीदरम्यान माहे एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये कार्यकारी अभियंता सतिश वाघमारे आणि राजेंद्र मोराणकर यांचा समावेश होता. यावेळी त्यांच्या सेवाकाळातील उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली तसेच पुढील आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रभाग क्र. २३ थेरगाव गावठाण येथील पडवळनगर व इतर परिसरांमध्ये पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २१ पिंपरी परिसरातील खचलेले ब्लॉक दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच प्रभाग क्र. २१ मधील फुटपाथ, पावसाळी गटर व इतर स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. १ मधील औद्योगिक परिसरातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सन २०२५-२६ साठी ताथवडे व पुनावळे परिसरात आवश्यक ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकणे, वॉल्व बसविणे तसेच अनुषंगिक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. मौजे ताथवडे जीवननगर येथील पाण्याच्या टाकीवरून पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन जलवाहिनी टाकण्यास मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या ताळेबंदपत्रकाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली. क व ई क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत गांधीनगर, बालाजीनगर, संजय गांधीनगर व इतर झोपडपट्टी परिसरांमध्ये गटार करणे, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे व स्थापत्य विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील आकुर्डी माध्यमिक विद्यालयातील एमएस-सीआयटी केंद्रासाठी फर्निचर खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सन २०२५-२६ साठी किवळे व रावेत येथील उंच पाण्याच्या टाकीच्या जलक्षेत्रात नव्याने विकसित होणाऱ्या भागांसाठी नवीन जलवाहिनी टाकणे व अनुषंगिक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली.

ह प्रभागातील सन २०२३-२४ साठी प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी परिसरातील देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २९ पिंपळेगुरव येथील वैद्यवस्ती, सुदर्शननगर, जवळकरनगर व इतर परिसरांमध्ये जलनिस्सारण नलिका टाकणे व सुधारणा कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्र. २६ पिंपळेनिलख येथील विशालनगर, कस्पटे वस्ती, वाकड आदी भागांमध्ये जलनिस्सारण नलिका टाकणे व सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र. ३१ नवी सांगवी येथील रामनगर व इतर परिसरांमध्ये जलनिस्सारण व्यवस्थेत आवश्यक सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच पिंपरी येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चासही स्थायी समितीने मंजुरी दिली.

> पिंपरी चिंचवड शहराचा वेगाने होत असलेला विस्तार लक्षात घेऊन पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. आजच्या स्थायी समिती सभेत स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, जलनिस्सारण, आरोग्य व शिक्षण या सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांतील कामांना मंजुरी देण्यात आली आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईनच्या कामांना गती देण्यावर भर देण्यात आला आहे.
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पीएमआरडीएच्या २९ रस्ते प्रकल्पांना गती; ‘थर्ड पार्टी’ ऑडिट अनिवार्य

पिंपरी (दै. संध्या)

■ कामाच्या गुणवत्तेवर भर; पावसाळ्यापूर्वी प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट, ग्रामीण विकासाला चालना

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाची पावले उचलली आहेत. प्राधिकरणाच्या 29 महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांचा आढावा घेत पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी कामांना गती देण्याचे निर्देश दिले असून, कामाच्या गुणवत्तेसाठी ‘थर्ड पार्टी’ ऑडिट अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे प्रकल्पांमध्ये पारदर्शकता वाढण्याबरोबरच टिकाऊ दर्जाही सुनिश्चित होणार आहे. पीएमआरडीएचे कार्यक्षेत्र तब्बल 5,215 चौरस किलोमीटर इतके विस्तीर्ण असून, त्यात मावळ, मुळशी, हवेली, भोर, दौंड, शिरूर, खेड, पुरंदर आणि वेल्हे या नऊ तालुक्यांतील 674 गावांचा समावेश आहे. या ग्रामीण भागांमध्ये सक्षम रस्ते जाळे उभारल्यास औद्योगिक, व्यावसायिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे. अभियांत्रिकी विभागासोबत झालेल्या बैठकीत आयुक्तांनी प्रलंबित आणि सुरू असलेल्या प्रकल्पांचा सखोल आढावा घेतला. विशेषतः पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. रस्त्यांच्या कामांमध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी तांत्रिक प्रक्रियांमध्ये शिस्त आणण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## कामाच्या जागी जाऊन कष्टकरी कामगारांना केले सन्मानित

पिंपरी (दै. संध्या)



दिलासा संस्था आणि पुणे जिल्हा गुणवंत कामगार विकास समितीच्या वतीने १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या पूर्वसंध्येला कष्टकरी कामगारांना 'मानवी दिलासा पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या कामाच्या जागी सन्मानित करण्यात आले. यामध्ये धोंडीबा लक्ष्मण वाघमारे आणि कस्तुरा धोंडीबा वाघमारे हे (चर्मकार) दांपत्य, राजू काळूराम पवार आणि शालन राजू पवार हे (लोहार) दांपत्य तसेच रवींद्र नारायण डोळस (सांगवी स्मशानभूमी सेवक) यांचा समावेश होता. पुरस्कारार्थींना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि अर्थसाहाय्य देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक, पुणे जिल्हा गुणवंत कामगार विकास समितीचे अध्यक्ष प्रकाश घोरपडे, जयश्री गुमास्ते, अरुण परदेशी, मुरलीधर दळवी, शामराव सरकाळे, शाम बारसे हे सदस्य उपस्थित होते. यावेळी पुणे जिल्हा गुणवंत कामगार विकास समितीचे अध्यक्ष प्रकाश घोरपडे म्हणाले, 'ऊन, वारा, थंडी, पाऊस याची तमा न बाळगता दररोज हे कष्टकरी कामगार 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा!' हे ब्रीद उराशी बाळगून काम करीत असतात. या कष्टकरी कामगारांचा यथोचित सन्मान करताना दोन्ही संस्थांना अत्यानंद झाला आहे!' नामदेव घाटणे, सोमनाथ राऊत, राम कांबळे, अशोक वाघमारे, सुनीता कांबळे, अनिता कांबळे, लक्ष्मण वाघमारे, सुभाष घाटणे गणपती घाटणे, दिनेश नाईकनवरे ही सन्मानार्थी यांची कौटुंबिक माणसे यावेळी उपस्थित होती. मुरलीधर दळवी यांनी आभार मानले.

## अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची धडक कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

■ पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामधारकांना महानगरपालिका प्रशासनाचा कडक इशारा



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जगताप डेअरी ते वाकड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर आज सकाळी १० वाजल्यापासून व्यापक कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाई दरम्यान परिसरातील ६ हजार ९४५ चौ. मी. अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या ३३ पत्रा शेडवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. या अनुषंगाने वाकड परिसरातील एकूण १०४ मालमत्तांची यादी तयार करण्यात आली होती. न्यायालयीन स्थगिती (स्टे) तसेच अटींसह स्थगिती (कंडिशनल स्टे) असलेल्या मालमत्ता वगळता उर्वरित सर्व अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर ड क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी कारवाई वेळी मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घारगे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, किशोर ननवरे आणि पूजा दूधनाळे यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या कारवाईत बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विजयकुमार सोनवणे, ड क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य अभियंता सुनील शिंदे तसेच उप अभियंता संजय चव्हाण, संजय बंडगर, श्याम गर्गे, विनायक माने, संदीप वैद्य हे सहभागी झाले होते. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक असे १५० अधिकारी व कर्मचारी, १०४ पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ६० जवान उपस्थित होते. तर अतिक्रमण हटविण्यासाठी १६ जेसीबीचां वापर करण्यात आला. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशमन दलाची एक गाडी आणि दोन ॲम्बुलन्स घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवून नागरिकांना सुरक्षित आणि नियोजनबद्ध शहरी सुविधा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच शहरातील कोणतेही अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. असे देखील प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत ‘चहापान’ खर्चावर प्रश्नचिन्ह

पिंपरी (दै. संध्या)

श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेवक म्हणून मिरवण्याचे अनेकांचे स्वप्न असते. त्यासाठी अनेक वर्षे प्रयत्नाची पराकाष्टा केली जाते. एकदा का, महापालिका सभागृहात प्रवेश केला की, त्यांच्यासह नातेवाईकांच्या अपेक्षा वाढतात. आपल्या प्रभागातील विकासकामांपेक्षा महापालिका तसेच, क्षेत्रीय कार्यालयात तसेच, सार्वजनिक कार्यक्रमात रुबाब करण्यावर त्याचा भर दिसतो. अपेक्षा वाढल्याने काही नगरसेवकांसह त्यांचे नातेवाईक, मित्रमंडळी, समर्थकही महापालिकेत चहापान आणि अल्पोहारासाठी कर्मचाऱ्यांना आदेश देत आहेत. प्रसंगी अरेरावी करत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सन्मानीयांच्या आप्तेष्टांचे फुकटचे चोचले पुरवण्यात प्रशासन मश्गुल झाले असून, त्यावर मोठा खर्च होत असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. महापालिकेत अधिकारी म्हणून रुजू होण्यासाठी राज्यभरातील अधिकारी तीव्र इच्छुक असतात. त्यासाठी पडद्यामागे बरेच प्रयत्न केले जातात. त्याबरोबरीने महापालिकेत नगरसेवक होण्यासाठी अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वप्न असते. बरीच मेहनत घेतल्यानंतर काहींना निवडणुकीत यश मिळते. महापालिकेत नगरसेवक म्हणून प्रवेश केल्यानंतर साहजिकच त्यांचा रुबाब वाढतो. अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्या सन्मानीयांचा यथायोग्य आदर व सन्मान केला जातो. त्यामुळे काही नगरसेवक हुरळून जात असल्याचे चित्र आहे. नगरसेवकांसह त्यांचे नातेवाईक, कुटुंबीय, समर्थक व कार्यकर्तेही महापालिका कारभारात हस्तक्षेप करत असल्याचे दिसून येत आहे.

# हिंजवडी पुन्हा तुंबली तर अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार; डॉ. अभिजीत चौधरी यांचा स्पष्ट इशारा

**आयटी पार्कमधील नालेसफाईसाठी ३१ मे ची ‘डेडलाईन’**

पिंपरी (दै. संध्या)




पावसाळ्यात हिंजवडी आयटी पार्क आणि परिसरात पाणी साचल्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस आता थेट संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाणार आहे. नियोजनाअभावी पाणी साचल्यास किंवा कोणतीही आपत्ती ओढवल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर ‘आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत’ जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशारा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिला आहे.

आकुर्डी येथील पीएमआरडीए मुख्यालयात बुधवारी (२९ एप्रिल) आयोजित पावसाळापूर्व आपत्ती व्यवस्थापन बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी ३१ मे २०२६ पूर्वी सर्व कामे पूर्ण करणे बंधनकारक केले आहे. हिंजवडी आणि माण आयटी पार्क परिसरात दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचून वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडवण्यासाठी केवळ बैठका नकोत, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी, असे स्पष्ट करत महानगर आयुक्तांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), एमआयडीसी, पीएमआरडीए, संबंधित ग्रामपंचायती आणि पाटबंधारे विभाग यांना समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले. विशेषतः प्रमुख नाले आणि आयटी पार्कमधील अंतर्गत रस्त्यांवरील पाण्याचा निचरा करण्यासाठी एकमेकांवर जबाबदारी न ढकलण्याबाबत त्यांनी बजावले.

पावसाळापूर्व कामांचा आढावा घेताना महानगर आयुक्तांनी महत्त्वाचे निर्देश दिले. त्यात हिंजवडी-माण परिसरातील मुख्य नाले तातडीने मोकळे करून त्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करावे, नाल्यांच्या प्रवाहात अडथळा ठरणारी सर्व अतिक्रमणे ३१ मेपूर्वी हटवावीत, तसेच नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहातून येणाऱ्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने व्हावा यासाठी पीएमआरडीएसह एमआयडीसी व संबंधित ग्रामपंचायतींनी विशेष खबरदारी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलीस शाखेने सुचवलेल्या उपाययोजना राबवण्याचे बैठकीत ठरले. यावेळी हिंजवडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी आयटी पार्क परिसरातील ‘ब्लॅक स्पॉट्स’ आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणांची माहिती सादर केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना प्रशासनाकडून अभिवादन

बारामती (दैनिक संध्या) : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तहसिल कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस तहसिलदार स्वप्निल रावडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी नायब तहसिलदार नामदेव काळे, नायब तहसिलदार भारत भिसे, स्वाती गायकवाड, यांच्यासह तहसिल कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



### अतिक्रमण नियमितीकरणाबाबत निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 अंतर्गत शासकीय जमिनीवरील 1 जानेवारी 2011 पर्यंतच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याबाबत राज्य शासनाने 25 मार्च 2026 रोजी महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला असला, तरी बारामती तालुक्यात त्याची अंमलबजावणी अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना त्यांच्या निवासासाठी कायदेशीर संरक्षण मिळण्याची संधी उपलब्ध झाली असली, तरी प्रशासनाकडून ठोस हालचाल न झाल्याने अनेक पात्र लाभार्थी अजूनही वंचित आहेत. स्थानिक स्तरावर या योजनेबाबत पुरेशी जनजागृती न झाल्यामुळे अनेक नागरिकांना शासन निर्णयाची माहितीच नाही. परिणामी, प्रत्यक्ष गरजूंना लाभ मिळण्याऐवजी योजना कागदोपत्रीच राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे यांनी बारामती तहसीलदारांना लेखी निवेदन देत शासन निर्णयाची तात्काळ आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. तसेच पात्र नागरिकांचे सर्वेक्षण, नोंदणी प्रक्रिया, जनजागृती शिबिरे आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासह प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्याची मागणी करण्यात आली आहे. निवास हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून शासनाचा निर्णय प्रत्यक्षात उतरला पाहिजे, असे नमूद करत कांबळे यांनी प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, बारामतीतील अनेक कुटुंबे वर्षानुवर्षे शासकीय जमिनीवर वास्तव्यास असून त्यांना कायमस्वरूपी हक्काची अपेक्षा आहे. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



### चोपडज येथे अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

चोपडज (दैनिक संध्या) : राष्ट्रीय स्ट्रेटस प्रबंधक संस्था माळेगांव खु.यांच्या माध्यमातून व अनुलोम संस्थेच्या प्रयत्नातून चोपडज ग्रामपंचायत यांनी संतुलित खतांचा वापर,विशेष मोहीम माती परीक्षण,सुक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य वापर, पिकांनुसार खतांचा वापर,मार्गदर्शन व अनुसूचित जाती उपयोजना 2025/26 वैयक्तिक पातळीवर घरगुती लागणारी भांडी यांचा लाभ घ्यावा,असे आवाहन डॉ नितीन कुऱ्हाडे यांनी केले.यावेळी डॉ.निलेश जोशी, डॉ.प्रशांत हंजागी,डॉ. गोरख शाह, सुनिल ढोले,वाघचौरे,बापू खेतरे,अनुलोम विभाग बारामती प्रमुख कृषी साहाय्यक रणजित धुमाळ यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच मनिषा भोसले,ग्रामविकास अधिकारी दिपाली लडकत,निलेश साळवे, गावातील शेतकरी व अनुसूचित जातींतील लाभार्थी बांधव उपस्थित होते. सुत्रसंचालन उमेश गायकवाड अनुसूचित जाती मोर्चा बारामती तालुका अध्यक्ष भाजपा यांनी केले. आभार सरपंच मनिषा भोसले यांनी मानले.यावेळी उपस्थित लोकांना शितपेय वाटप करण्यात आले.चोपडज येथे प्रथमच सामाजिक सलोख्याचा कार्यक्रम संपन्न झाला आहे,असे उमेश गायकवाड यांनी सांगितले.

### इंद्रायणी नदीपात्रात दोन महिलांचे मृतदेह; आळंदीत खळबळ




आळंदी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र आळंदी येथील सिद्धबेट परिसरात इंद्रायणी नदीपात्रात दोन अनोळखी महिलांचे मृतदेह तरंगताना आढळून आल्याने बुधवारी सायंकाळी परिसरात मोठी खळबळ उडाली. सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास ही घटना उघडकीस आली असून, प्राथमिक तपासात आत्महत्येचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांना नदीपात्रात काहीतरी तरंगत असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी जवळ जाऊन पाहणी केली असता दोन महिलांचे मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर नागरिकांनी तातडीने आळंदी पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही मृतदेह बाहेर काढले. घटनास्थळी पाहणी करताना या दोन्ही महिलांनी साडीच्या सहाय्याने एकमेकींना घट्ट बांधून घेतल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे दोघींनी एकत्रितपणे नदीत उडी घेत आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मृतांपैकी एका महिलेचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, तर दुसऱ्या महिलेचे वय सुमारे ३५ वर्षे असल्याचे समोर आले आहे. या महिला नेमक्या कोण, तसेच त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. या महिला माय-लेकी आहेत की नातेवाईक, याचा तपास आळंदी पोलीस करीत असून, परिसरातून कोणी बेपत्ता असल्याची नोंद आहे का याचीही पडताळणी सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे आळंदी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भामा-आसखेड धरणातून तिसरे आवर्तन सुरू



**आंबेठाण (दै. संध्या)**

भामा आसखेड ( ता.खेड ) धरणातून चालू वर्षाच्या उन्हाळी हंगामातील तिसरे आवर्तन सोडण्यात आले आहे.यासाठी धरणाच्या आयसीपीओमधून १००० क्युसेसने पाणी भामा नदी पात्रात सोडण्यात आले आहे.

भामा-आसखेड धरणात सध्या ५०.८४ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून तो गतवर्षी २७.४९ टक्के होता.यावर्षी पाणीसाठा जरी जास्त असला तरी मात्र वाढत्या उन्हाची तीव्रता आणि आगामी काळातील पाणी वापर लक्षात घेता काटेकोर पाणी व्यवस्थापनाचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ५०% पेक्षा अधिक साठ्यामुळे शेतीला दिलासा!

भामा आसखेड हे भामा नदीवर करंजविहिरे येथे उभारलेले मातीचे धरण आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता ८.१४ टीएमसी आहे. यावर्षी धरण परिसरात मुबलक म्हणजे १२५० मिमी पाऊस झाला आहे. सध्या धरणात एकूण पाणीसाठा हा ४.३७ टीएमसी असून उपयुक्त पाणीसाठा हा ३.९० टीएमसी इतका आहे.

धरणातील उपलब्ध साठ्यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागासह खेड,शिरूर आणि दौंड परिसरातील पाणीपुरवठा योजनांना सध्या कोणतीही मोठी अडचण भासणार नाही असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.या धरणातून पुणे महापालिका आणि आसपासच्या ग्रामीण भागाला पिण्याचे व सिंचनाचे पाणी पुरवठा केला जातो.त्यामुळे या पाणीसाठ्याचा थेट परिणाम शेती,पिण्याचे पाणी आणि औद्योगिक वापरावर होतो.

उन्हाळ्यात पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक आहे.पाण्याच्या आवर्तनांचे नियोजन, बंधाऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविणे आणि शेतीसाठी आवश्यक तेवढाच वापर यावर प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. पुढील काही आठवड्यांत तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

> उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतीपिकांना पाण्याची मोठी गरज होती.अनेक भागांमध्ये पाण्याअभावी शेतकरी अडचणीत सापडले होते.ही परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाकडे पाठपुरावा करून धरणातून पाणी सोडण्याची मागणी केली होती.यामुळे शेतीपिके आणि पिण्याच्या पाणी योजना यांना दिलासा मिळणार आहे.
>
> **- बाबाजी काळे (आमदार,खेड-आळंदी)**

धरणातील पाणीसाठा समाधानकारक असला तरी आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी व्यवस्थापन हे मोठे आव्हान ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे.



## रांगोळी प्रदर्शनातून खंडोबा अवतार चरित्र साकार

**जेजुरी (दै. संध्या)**

श्रीरंग कलादर्पण फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून रंगावली प्रदर्शन बालगंधर्व कलादालन, पुणे या ठिकाणी भरविण्यात आले आहे. सदरील प्रदर्शनाचे जय मल्हार मालिका सिने अभिनेते देवदत्त नागे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये श्री मार्तंड देवसंस्थान चे अध्यक्ष ॲड. विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर, श्री मंगेश घोणे, श्री अनिल सौंदडे, ॲड. पांडुरंग थोरवे आदी विश्वस्त व संत तुकाराम महाराजांचे 10 वे वंशज ह. भ. प.शिवाजी महाराज मोरे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन अक्षय शहापूरकर व सहकाऱ्यांनी केले. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाच्या अवताराचे संपूर्ण चरित्र दर्शन रांगोळी मधून साकारण्यात आले आहे. जेजुरीच्या श्री खंडोबा देवाचा गाभारा प्रतिकृती, श्री जेजुरी गडावर साकारण्यात येणाऱ्या द्वादश मल्हार दर्शन सृष्टीची प्रतिकृती, ऐतिहासिक खंडा प्रतिकृती तसेच श्री खंडेरायाची पगडी दर्शनासाठी ठेवण्यात आली आहे. सदरचे प्रदर्शन स दि. 30 एप्रिल ते 3 मे असे तीन दिवस पाहता येणार आहे.

## वाढलेल्या तापमानाचा जीवसृष्टीवर परिणाम; गलित गात्र झालेल्या घुबडाला जीवदान

**नारायणगाव (दै. संध्या)**

वारुळवाडी येथील शिव अमृत सोसायटीमध्ये आज दुपारी गव्हाणी जातीचे दुर्मिळ घुबड गलितगात्र अवस्थेत आढळून आले. उन्हाच्या तीव्रतेमुळे व अन्न पाणी न मिळाल्यामुळे गलित गात्र झालेल्या घुबडाला वनविभाग व रेस्क्यू टीममधील तरुण सदस्यांच्या सतर्कतेमुळे जीवदान मिळाले. यावर्षी वाढलेल्या तापमानाचा परिणाम मोठ्या प्रमाणात जीवसृष्टीवर झाल्याचे दिसून येत आहे. वारुळवाडी येथील शिव अमृत सोसायटीमध्ये आज दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास गलितगात्र अवस्थेत घुबड स्थानिक नागरिकांना आढळून आले.

याबाबतची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, सुवर्णा केदार, रेस्क्यू टीमचे सुशांत भुजबळ, आदित्य डेरे, शंतनू डेरे दाखल झाले. त्यांनी घुबडाला ताब्यात घेऊन पाणी पाजले. ओल्या फडक्याने त्याला गारवा तिला. त्यानंतर घुबड हालचाल करू लागले.

# माजी आमदार बापूसाहेब खैरे यांची पुण्यतिथी साजरी

**जेजुरी (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्याचे माजी आमदार स्व. बापूसाहेब खैरे यांनी 15 वी पुण्यतिथी कोडीत येथे साजरी करण्यात आली. पुरंदर तालुक्यातील कोडीत येथे आयोजित कार्यक्रमाच्या सुरवातीला माजी आमदार बापूसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्व एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे प्रमुख संतोष जगताप यांनी त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि विकासकामांतील योगदानाची आठवण करून दिली.



स्व. बापूसाहेब खैरे यांनी पुरंदर तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कामे केली. त्यांच्या कार्यकाळात रस्ते, पाणीपुरवठा, धरणे, बंधारे,शिक्षण आणि शेती क्षेत्रात अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्यांच्या साध्या स्वभावामुळे आणि लोकांशी असलेल्या जवळिकीमुळे ते सर्वसामान्यांच्या मनात आजही जिवंत आहेत.असे यावेळी भाजपचे कार्यालयीन प्रमुख धनजंय कामठे यांनी सांगितले.

यावेळी नगरसेविका अमृता कामठे, जिल्हा भाजपा एनजीओ आघाडीचे अध्यक्ष संतोष जगताप, भैय्यासाहेब खैरे,अजित खैरे, सुधाकर बढदे , मीना खैरे,जयप्रकाश सरक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# शेलारवाडी नजीक असलेल्या पाझर तलावांची दुरुस्ती



**काळदरी (दै. संध्या)**

काळदरी ग्रामपंचायत हद्दीतील शेलारवाडी नजीक असलेल्या पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामाला रविवारी (दि. २६ एप्रिल २०२६) उत्साहात सुरुवात करण्यात आली. 'ग्राम गौरव प्रतिष्ठान' या संस्थेच्या 'जलसंधारण शाश्वत शेती' प्रकल्पांतर्गत हे काम हाती घेण्यात आले असून, ग्रामस्थांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. शेलारवाडी परिसरातील पाझर तलाव अनेक दिवसांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत होता. या तलावाची दुरुस्ती झाल्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होऊन परिसरातील शेतीला आणि भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या पार्श्वभूमीवर, ग्रामस्थांच्या उपस्थितीत नारळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी ग्राम गौरव प्रतिष्ठानचे प्रतिनिधी सागर भोंडे, प्रशांत कुंभारकर, ऋषी बाळीद उपस्थित होते. तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ प्रल्हाद जगताप, निलेश शेलार, रामभाऊ कोकरे, सुनील जगदाळे, दिलीप थोपटे, निलेश थोपटे, संदीप थोपटे आणि ॲड. राहुल थोपटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. काळदरी ग्रामपंचायत हद्दीत राबवल्या जाणाऱ्या या जलसंधारणाच्या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त होत आहे.

आदर्श ग्रामपंचायत काळदरी आणि समस्त ग्रामस्थांच्या वतीने आदर्श ग्राम काळदरीच्या मा. उपसरपंच सौ. राणीताई राहुल थोपटे यांनी या प्रकल्पाला आणि संस्थेला शुभेच्छा दिल्या. "पाणी हे शेतीचा कणा आहे.

ग्राम गौरव प्रतिष्ठानने जलसंधारणाच्या माध्यमातून घेतलेला हा पुढाकार काळदरी आणि शेलारवाडी परिसराचा कायापालट करणारा ठरेल," अशा भावना ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केल्या.

## मानवी-बिबट व वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती कार्यशाळा

**घोडेगाव (दै. संध्या)**

घोडेगाव ता आंबेगाव येथील वनपरीक्षेत्रात बिबट तसेच अन्य वन्यप्राणी व मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे व उपवनसंरक्षक जुन्नर प्रशांत खाडे यांच्या संकल्पनेतून व सहाय्यक वनसंरक्षक जुन्नर अमृत शिंदे यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली. सदर कार्यशाळेत वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके, वन्यजीव तज्ज्ञ सुशील सहारे, सौमित्र तिजारे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुरलीधर असवले यांनी मार्गदर्शनपर जनजागृती कार्यशाळा वारंवार गावा गावांमध्ये घेण्याची आवश्यकता असल्याचे अधोरेखित केले. उपसरपंच श्रीमती शुभांगी काळे यांनी त्यांचे जंगल व मानव यांचे असणारे घनिष्ठ नाते व ते



सुदृढ ठेवणेची गरज याबाबत स्वानुभव सांगितले. बिबट अथवा अन्य वन्य प्राणी समोर आल्यावर काय काळजी घ्यावी, कोणती उपाययोजना अवलंबवावी याबाबत वनपरीक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांनी मार्गदर्शन दिले. व्यासपिठावरील पोलीस पाटील सुनील डामसे, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा भगत, वनपाल तिरपाड गुलाब इथापे, वनपाल शिनोली प्रवीणकुमार लांघी यांनी वन्यप्राणी व मानव सहजीवनाचे महत्व चर्चेतून पटवून दिले. वनपाल घोडेगाव भाऊसाहेब झंझरे व वनरक्षक घोडेगाव संजय गायकवाड यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करून तो यशस्वीरित्या पार पाडला.

# कुसेगाव वन्य प्राण्यांना पाणी सोडून साजरे केले जातात वाढदिवस

**दौंड (दै. संध्या)**

दौंड, जिल्हा पुणे येथील जनहित फाउंडेशन ने आध्यात्मिक गुरु तात्या महाराज ढमाले यांच्या आशीर्वादाने या उन्हाळ्यात वन्य प्राण्यांना पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून "पुण्य कर्म अभियान" राबविण्याचे ठरवले व या सामाजिक कार्यास परिसरातील नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळतोय आज युवा उद्योजक अमित शंकरराव शितोळे व स्वयम गणेश मोरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दोन पाणी टँकर (१० हजार लिटर) पाणी मयुरेश्वर अभयारण्यातील सुपे येतील पाणवठ्यात सोडण्यात आले या आधीही पाटस येथील उद्योजक विक्रांत गायकवाड,रोटी येथील महेश नारायण शितोळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्ताने पाणी सोडले होते तरुण वर्ग इतर



वायफट खर्च टाळून वन्य प्राण्यांना वाढदिवसानिमित्त तर महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक भावनेतून वन्य प्राण्यांना पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून पाणी सोडणाऱ्या व या साठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

फक्त वन विभागातील पाणवठ्यातच वन्य प्राण्यांना पाण्याची व्यवस्था केली असे नाही तर गावठाणात फिरस्ती मुक्या प्राण्यांसाठी पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था ही जनहित फाउंडेशन च्या वतीने करण्यात आली आहे आज पर्यंत एकूण १३ पाणी टँकर सोडण्यात आले अशी माहिती जनहित फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनोज फडतरे यांनी दिली.

या वेळी मा. सरपंच संभाजी खडके, गणेश चोरमले, नितीन शितोळे, गणेश मोरे, अनिल सूर्यवंशी, सार्थक मोरे, बाळू सोनवणे, वन कर्मचारी बापू शितोळे आदी उपस्थित होते.

> वन्य प्राण्यांना व पशु पक्षांना पाणी सोडण्याची व्यवस्था करणे हा उपक्रम खरंच स्तुत्य आहे मी या पूर्वी पण पाण्याची व्यवस्था केली होती आज वाढदिवसानिमित्त पुन्हा एकदा पाण्याचा टँकर दिल्या नंतर मला आत्मिक समाधान मिळाले पुढेही गरज पडल्यास मदत करूया मी जनहित फाउंडेशनच्या पुण्य कर्म अभियानास मनपूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो असे.
>
> **- अमित शंकरराव शितोळे मनोगत**

> उन्हाळ्याची तीव्रता पाहता पाऊस पडेपर्यंत आपल्याला पाणी सोडणे अत्यंत गरजेचे आहे ज्या कोणाला सद्भावनेने प्राण्यांची सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून पाण्याची व्यवस्था करायची असेल तर नक्की जनहित फाउंडेशनच्या विश्वस्तांशी संपर्क साधावा. असे आव्हान मनोज फडतरे केले.

# महाराष्ट्र दिन

## इतिहास, अस्मिता, संस्कृती आणि प्रगतीचा विराट उत्सव

दरवर्षी १ मे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून संपूर्ण राज्यात अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला जातो. १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषिक जनतेच्या दीर्घकाळच्या स्वप्नांना साकार रूप मिळाले. हा दिवस केवळ राज्य निर्मितीचा स्मरणदिन नसून, मराठी अस्मिता, संघर्ष, सांस्कृतिक वैभव आणि आधुनिक प्रगतीचा गौरव करणारा दिवस आहे.




### संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि संघर्षाचा इतिहास

महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीला एक मोठा संघर्ष आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही मराठी भाषिकांच्या हक्कांसाठी उभी राहिलेली ऐतिहासिक चळवळ होती. 'एकच मागणी – संयुक्त महाराष्ट्र' या घोषणेने प्रेरित होऊन हजारो कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानामुळे अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी म्हणून घोषित झाली आणि मराठी जनतेच्या स्वप्नांना मूर्त रूप मिळाले.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळ : त्याग, संघर्ष आणि विजयाची गाथा**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती सहजासहजी झालेली नाही. त्यामागे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा प्रखर इतिहास आहे. भाषिक राज्यांच्या मागणीसाठी संपूर्ण देशभर चळवळी सुरू असताना मराठी भाषिक लोकांनी 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' ही मागणी उचलून धरली.

या चळवळीत शेतकरी, कामगार, विद्यार्थी, लेखक, कलाकार अशा सर्व स्तरांतील लोकांनी सक्रिय सहभाग घेतला. आंदोलन, मोर्चे, सत्याग्रह यांच्या माध्यमातून शासनावर दबाव निर्माण करण्यात आला.

या लढ्यात १०५ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या त्यागामुळे अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई ही राजधानी म्हणून घोषित झाली आणि मराठी जनतेच्या संघर्षाला यश मिळाले.

हा इतिहास प्रत्येक मराठी माणसाला अभिमानाची जाणीव करून देतो.

**मराठी अस्मिता आणि सांस्कृतिक वारसा**

महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि योद्ध्यांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्यगाथांनी स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली, तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्या विचारांनी समाजाला अध्यात्मिक दिशा दिली.

वारकरी संप्रदाय, पंढरपूरची वारी, अभंग-भजन परंपरा ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची आत्मा आहे.

लोककलेच्या दृष्टीने लावणी, तमाशा, पोवाडा, भारुड या कला प्रकारांनी ग्रामीण आणि शहरी जीवनात रंग भरले आहेत.

गणेशोत्सव (गणेशोत्सव), गुढीपाडवा, दिवाळी, मकरसंक्रांत यांसारखे सण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक आहेत.

सामाजिक सुधारणांची परंपरा महाराष्ट्राने सामाजिक परिवर्तनातही मोठे योगदान दिले आहे. सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि स्त्री-पुरुष समतेसाठी मोठा लढा दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समानता आणि संविधानाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा दिली.

या महान व्यक्तींच्या कार्यामुळे महाराष्ट्रात शिक्षण, समानता आणि सामाजिक जागृतीचा पाया मजबूत झाला.

**औद्योगिक आणि आर्थिक सामर्थ्य**

महाराष्ट्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख इंजिन आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून शेअर बाजार, बँकिंग, चित्रपटसृष्टी आणि उद्योग क्षेत्रात अग्रस्थानी आहे.

पुणे हे 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून ओळखले जाते आणि आयटी, ऑटोमोबाईल व

> "जय महाराष्ट्र!" हा घोष केवळ भावना नाही, तर प्रत्येक मराठी माणसाच्या अभिमानाचा आवाज आहे.

शिक्षण क्षेत्रात मोठे केंद्र आहे.

नाशिक, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर यांसारखी शहरेही औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

स्टार्टअप्स, डिजिटल तंत्रज्ञान आणि परदेशी गुंतवणूक यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

**शिक्षण, विज्ञान आणि नवोन्मेष**

महाराष्ट्र शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत अनेक दर्जेदार संस्था येथे कार्यरत आहेत.

पुणे, मुंबई आणि नागपूर ही शहरे शैक्षणिक केंद्रे म्हणून प्रसिद्ध आहेत. संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यामध्ये महाराष्ट्रातील युवक मोठी भूमिका बजावत आहेत.

स्टार्टअप संस्कृती आणि उद्योजकतेमुळे राज्य नव्या कल्पनांना प्रोत्साहन देत आहे.

**कृषी, सहकार आणि ग्रामीण विकास**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था केवळ उद्योगांवर नाही तर कृषीवरही आधारित आहे. ऊस, कापूस, द्राक्षे, डाळी आणि धान्य पिके राज्याच्या कृषी क्षेत्राचा कणा आहेत.

सहकारी चळवळीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळाले. साखर कारखाने, दूध संघ, बँका यांमुळे ग्रामीण भागाचा विकास झाला.

पाणी व्यवस्थापन, सिंचन योजना आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात प्रगती होत आहे.

**पर्यटन आणि नैसर्गिक वैभव**

महाराष्ट्र निसर्गसौंदर्याने समृद्ध आहे. सह्याद्री पर्वतरांग, कोकण किनारपट्टी, ऐतिहासिक किल्ले आणि धार्मिक स्थळे यामुळे राज्य पर्यटनासाठी आकर्षण ठरते.

राजगड, रायगड, सिंहगड, अजिंठा-वेरूळ लेणी, महाबळेश्वर, लोणावळा यांसारखी ठिकाणे देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करतात.

**आजचा महाराष्ट्र : आव्हाने आणि संधी**

- महाराष्ट्र आज आधुनिकतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असला तरी काही आव्हाने कायम आहेत.
- शहरीकरण, पर्यावरण प्रदूषण, पाणीटंचाई, बेरोजगारी यांसारख्या समस्यांवर उपाय शोधणे आवश्यक आहे.
- तंत्रज्ञानाचा योग्य वापर, शाश्वत विकास आणि सामाजिक समता यावर भर देऊन राज्य अधिक प्रगत बनू शकते.

**एकजुटीने पुढे जाण्याची प्रेरणा**

महाराष्ट्र दिन हा आपल्या इतिहासाची आठवण करून देणारा आणि भविष्याचा मार्ग दाखवणारा दिवस आहे.

हुतात्म्यांच्या बलिदानाचा सन्मान राखत, सामाजिक एकता आणि प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.

"जय महाराष्ट्र!" हा घोष प्रत्येक मराठी माणसाच्या हदयातील अभिमान आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे.

## फ्लिपकार्ट, एक्सिस बँक आणि पे यू तर्फे प्रथमच कार्ड पेमेंट्स करतांना बायोमेट्रिक ऑथेटिकेशनची सुरुवात

मुंबई (दै. संध्या)

फ्लिपकार्ट या भारतातील होमग्रोन ई कॉमर्स मार्केटप्लेस तर्फे आज एक्सिस बँक या भारतातील सर्वांत मोठ्या खाजगी बँकांपैकी एक असलेल्या बँके सह पे यू या वैविध्यपूर्ण फिनटेक मंचा बरोबर सहकार्य करार केल्याची घोषणा केली, या अंतर्गत त्यांनी कार्ड पेमेंट्स साठी बायोमेट्रिक ऑथेंटिकेशनची सुरुवात केली आहे. या तीन विश्वसनीय संस्थांनी या उपक्रमासाठी भागीदारी केली असून यामुळे ग्राहकाभिमुख दृष्टिकोन वाढवत त्यांनी भारतीय ग्राहकांप्रती असलेली त्यांची वचनबध्दता अधोरेखित केली आहे.

या उपक्रमामुळे वापरकर्त्यांना फिंगरप्रिंट किंवा फेस आयडी साठी योग्य अॅन्ड्रॉईड आणि आयओएस उपकरणांवर त्यांचे फिंगरप्रिंट किंवा फेस आयडी वापरून व्यवहारांची पडताळणी करता येते, ज्यामुळे वन टाईम पासवर्ड (ओटीपी)ची आवश्यक राहत नाही. ही सेवा प्रथम ॲक्सिस बँक च्या कार्डधारकांसाठी इश्यूअर-लेव्हल बायोमेट्रिक पडताळणीद्वारे सक्षम करण्यात आली आहे. या सुरुवातीसह, फ्लिपकार्ट हे कार्ड पेमेंटसाठी बायोमेट्रिक प्रमाणीकरण देणाऱ्या प्रमुख भारतीय ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मपैकी एक बनले आहे.

या सविधेमुळे ग्राहकांना अधिक सुरक्षित प्रमाणीकरणाची पद्धत प्राप्त होते ज्यामुळे डिव्हाइस फिंगरप्रिंटिंग आणि सुधारित तपासणी करण्यास सक्षम आहे, ज्यामुळे सीम स्वॅप किंवा ओटीपी वर आधारित फसवणुकीचा धोका कमी होतो. ही डिजिटल पेमेंट्समधील महत्त्वाच्या अडथळ्यांना पार करते आणि एसएमएस वर आधारीत ओटीपीज ची जागा घेते, ज्याऐवजी जलद आणि अधिक सुरक्षित अशी यंत्रणा वापरली जाते जी स्मार्टफोन वापरकर्त्यांना आधीपासूनच परिचित आहे. या सहकार्याअंतर्गत, पेयू व्यापारी-पक्षाच्या पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन करते, ज्यात डिव्हाइसची सुरक्षा आणि प्रमाणीकरण फ्लोचा समावेश आहे, तर ॲक्सिस बँक जारीकर्ता-पक्षावर बायोमेट्रिक पडताळणी सक्षम करण्यासाठी विम्बो चा वापर करते.

बायोमेट्रिक प्रमाणीकरण भारतातील अतिशय जटील डिजिटल पेमेंट फसवणूक परिस्थितीवर मात करते, कारण आरबीआयशी -संबंधित आकडेवारीनुसार वर्ष २०२४ मध्ये फसवणुकीची रक्कम पाचपटपेक्षा अधिक वाढून १,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. याला प्रतिसाद म्हणून, भारतीय रिझर्व्ह बँकेने 'डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी प्रमाणीकरण यंत्रणा निर्देश, २०२५' हे परिपत्रक जारी केले, ज्यात एसएमएस ओटीपी ऐवजी बायोमेट्रिक आणि जोखमीवर आधारित प्रमाणीकरण स्वीकारण्यास स्पष्टपणे प्रोत्साहन दिले आहे. या नियामक दृष्टिकोनाशी धोरणात्मकरीत्या सुसंगत राहून, फ्लिपकार्ट- पे यू- ॲक्सिस बँक भागीदारी सुरक्षा वाढवते, व्यवहारातील यशाचा दर सुधारते आणि अधिक मजबूत पेमेंट परिसंस्था निर्माण करते, तसेच आरबीआय च्या अधिक सक्षम डिजिटल प्रमाणीकरण यंत्रणांसाठीच्या आदेशाची पूर्तता करते.

या सुरुवाती विषयी बोलतांना फ्लिपकार्टच्या पेमेंट्स अॅन्ड सुपरकॉईन्सचे उपाध्यक्ष गौरव अरोरा यांनी सांगितले " फ्लिपकार्ट मध्ये आम्ही नेहमीच नाविन्यपूर्ण दृष्टिकोन हा सक्षम वचनबध्दतेसह ग्राहकांच्या विश्वासासाठी निर्माण करत असतो. बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन वैशिष्ट्याच्या सुरुवातीमुळे आम्ही ग्रहकांच्या पेमेंट्स मध्ये सुरक्षा आणण्याची आमची वचनबध्दता दर्शवून सातत्याने वाढणाऱ्या डिजिटल फसवणूकीपासून पेमेंट्सचा बचाव करत आहोत.

## अरिहंत अकॅडमीला एक्सलन्स इन कोचिंग अँड कॉम्पिटिटिव्ह प्रेप पुरस्कारासह सन्मानित

मुंबई (दै. संध्या)

अरिहंत अकॅडमी या महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थेला इकॉनॉमिक टाइम्स महाराष्ट्र बिझनेस अवॉर्ड्स २०२६ च्या पहिल्या एडिशनमध्ये 'एक्सलन्स इन कोचिंग अँड कॉम्पिटिटिव्ह प्रेप' पुरस्कारासह सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा हॉटेल ताज लँड्स एंड येथे पार पडला, ज्यामध्ये राज्यामधील उद्योग क्षेत्रातील दिग्गज, धोरणकर्ते आणि नाविन्यपूर्ण संकल्पना राबविणारे मान्यवर एकत्र आले होते. इकॉनॉमिक टाइम्स महाराष्ट्र बिझनेस अवॉर्ड्स हे शिक्षण, आरोग्य सेवा, रिअल इस्टेट, ऊर्जा आणि लॉजिस्टिक यांसारख्या राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासाला गती देणाऱ्या विविध क्षेत्रांतील उत्कृष्टतेचा गौरव करतात. १५०० हून अधिक प्रतिनिधी आणि २०० हून अधिक वक्त्यांचा सहभाग असलेल्या मोठ्या महाराष्ट्र बिझनेस समिटचा हा एक भाग आहे,




ज्याद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम आणि परिवर्तनात्मक प्रभाव पाडणाऱ्या संस्थांना सन्मानित केले जाते.

अरिहंत अकॅडमीला एक्सलन्स इन कोचिंग अँड कॉम्पिटिटिव्ह प्रेप श्रेणीमध्ये मिळालेल्या या सन्मानामधून विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट शैक्षणिक निकाल, अध्यापनाच्या प्रगत पद्धती आणि जेईई, नीट, यूपीएससी, एमपीएससी व बँकिंग यांसारख्या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविलेले वैयक्तिक मार्गदर्शन यांप्रती असलेली त्यांची सातत्यपूर्ण निष्ठा दिसून येते.

या यशाबद्दल मत व्यक्त करत अरिहंत अकॅडमीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक (एमडी) अनिल कपासी म्हणाले, "हा सन्मान आमच्यासाठी अभिमानास्पद टप्पा आहे. इकॉनॉमिक टाइम्स महाराष्ट्र बिझनेस अवॉर्ड्स सारख्या प्रतिष्ठित व्यासपीठावर सन्मानित झाल्यामुळे आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे की, सातत्यपूर्ण निकाल, विद्यार्थ्यांचा सर्वप्रथम विचार आणि निरंतर नाविन्य हेच भविष्यासाठी सज्ज विद्यार्थी घडवण्याची गुरुकिल्ली आहे. आम्ही हा पुरस्कार आमचे विद्यार्थी, शिक्षक आणि संपूर्ण अरिहंत समुदायाला समर्पित करतो, ज्यांनी या प्रवासात मोलाचे योगदान दिले आहे."

महाराष्ट्रभर उपस्थिती असलेल्या अरिहंत अकॅडमीने आपली शैक्षणिक उत्कृष्टता आणि विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मोठी प्रतिष्ठा निर्माण केली आहे. या संस्थेच्या शिकवण्याच्या पद्धतीमध्ये पद्धतशीर अभ्यासक्रम आणि प्रत्येक विद्यार्थ्याकडे दिले जाणारे वैयक्तिक लक्ष यांचे संयोजन आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांमधील वाढती गुंतागुंत यशस्वीपणे हाताळण्यास मदत होते.

दर्जेदार कोचिंग आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीची मागणी वाढत आहे, तसतसे अरिहंत अकॅडमी सुलभता आणि निकाल-केंद्रित शिक्षणाद्वारे आपला प्रभाव विस्तारण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

## गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान

वैशाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते.



गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दुःखाचे वास्तव सतत अस्वस्थ करत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. "जीवन दुःखमय का आहे?" आणि "या दुःखातून मुक्तीचा मार्ग कोणता?" या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती.

ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून 'मध्यम मार्ग' स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणजेच 'जागृत' झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखवला.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलतः मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वतःच्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो.

गौतम बुद्धांनी मांडलेली 'चार आर्य सत्ये' ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दुःखाचे मूळ 'तृष्णा' किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दुःखाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे.

या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी 'अष्टांगिक मार्ग' सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो.

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना धर्ममार्गावर समान स्थान दिले. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जात असताना बुद्धांनी त्यांना समानतेची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.

बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. 'करुणा' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे.

आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे 'मध्यम मार्ग' आणि 'संतुलित जीवन' यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंतःशांती आणि समाधान देतो.

पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला.

आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. "स्वतःच्या अनुभवातून सत्य जाणून घ्या" ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत 'सम्यक स्मृती' आणि 'सम्यक समाधी' या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्यामुळेच आजच्या आधुनिक मानसशास्त्रातही बुद्धांच्या ध्यानपद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे, संसाधनांचा मर्यादित आणि जबाबदारीने वापर करणे आणि सर्व जीवांचे संरक्षण करणे ही त्यांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरते. मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे.

बुद्धांचे तत्त्वज्ञान जागतिक स्तरावरही प्रभावी ठरले आहे. आशियातील अनेक देशांनी त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करून आपली सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था घडवली आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता आणि साधेपणा यामुळे ते सर्व स्तरांतील लोकांना समजण्यास आणि आचरणात आणण्यास सोपे वाटतात. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त ठरते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, विचारप्रवाह आणि जीवनशैली एकत्र येत आहेत, तिथे सहिष्णुता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांची आवश्यकता अधिकच वाढली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते.

गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला 'मध्यम मार्ग' हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.

वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल.

आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अधःपतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वतःच्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो.

शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतो हीच या दिनाची खरी शिकवण आहे.

•••

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री नृसिंह जयंतीनिमित्त संजीवन समाधीवर साकारला श्री नृसिंह अवतार

आळंदी (दैनिक संध्या) : श्री नृसिंह जयंतीच्या पावन निमित्ताने आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी परिसरात भगवान श्री नृसिंह अवताराची भव्य आणि देखणी साकारणा करण्यात आली. या आकर्षक कलाकृतीने भाविकांचे लक्ष वेधून घेत भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली. पुण्यातील मूर्तिकार अभिजीत धोंडफले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत सुबक व प्रभावी पद्धतीने हा नृसिंह अवतार साकारला. बारकाईने केलेली रचना, भावपूर्ण मुखमुद्रा आणि आकर्षक सजावटीमुळे हा अवतार भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला. नृसिंह जयंतीनिमित्त मंदिर परिसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी या अवताराचे दर्शन घेत भक्तिभाव व्यक्त केला. संजीवन समाधी परिसर 'नृसिंह मय' झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

### नारायणगाव येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन



नारायणगाव (दैनिक संध्या) : राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान व ग्रामपंचायत नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शनिवार दि. 2 मे 2026 रोजी सकाळी 9 वाजता मुक्ताई समाज मंदिर, नारायणगाव येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार असून पुणे जिल्ह्यातील 10 वी 12 वी उत्तीर्ण / सर्व शाखांच्या पदवीधर उमेदवारांच्या तिथेच मुलाखती घेऊन त्यांना 50 पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.तरी जर कोणाला या रोजगाराचा फायदा घ्यायचा असेल त्यांनी धनेशभाऊ वारुळे (मो. 9665662707),जालिंदर खैरे (मो.9970797901),राजेश वारुळे (मो.9665422551),अझर शेख (मो.9527434642) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन नारायणगावचे उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी केले आहे.

### वैष्णवधाम येथे बालसंस्कार शिबिराचे आयोजन

नारायणगाव (दैनिक संध्या) : पारुंडे (वैष्णवधाम) येथील गुरुवर्य वैकुंठवासी कोंडाजी बाबा डेरे वारकरी शिक्षण संस्थेत गेल्या पाच वर्षांपासून मुलं आणि मुलींसाठी अध्यात्मिक व शैक्षणिक निवासी बालसंस्कार शिबिराचे आयोजन केले जात असते. यावर्षी हे शिबीर 27 एप्रिलपासून पुढील 12 दिवस हे शिबीर चालणार असल्याची माहिती संस्थेचे व्यवस्थापक शंकर पवार यांनी दिली. या शिबिरात ह. भ.प सारिका पवार,डॉ. प्रा. मंगल डोंगरे, डॉ.दिलीप कचेरे, डॉ.मोहम्मद जाफरी, स्वप्निल महाराज दातखिळे, डॉ. एफ. बी. आतार, मेघनाथ जाधव यांच्याकडून विविध विषयांवर मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच ह भ प पोपट महाराज खंडागळे यांच्या समारोपाच्या दिवशी प्रवचन होणार आहे. तसेच योग विषयी प्रा. एकनाथ डोंगरे, मल्हारी चव्हाण,सुनील पवार, रमेश महाराज ढोमसे, वैशाली बिडवई, शीतल पवार हे मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा.एकनाथ डोंगरे, रोटरी ऑफ जुन्नर शिवनेरीचे शिरीष जठार, उद्योजक बाळासाहेब खिलारी, शंकर साळुंके, सुभाष बोकरीया, संतोष रासने, धनंजय राजूरकर यांचे सहकार्य लाभणार आहे.

### डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांना पद्मश्री राष्ट्रीय उत्कृष्टता सन्मान पुरस्कार



चाकण (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष व चाकण, कडाचीवाडी येथील युवा उद्योजक डॉ. दत्तात्रय खांडेभराड यांना पद्मश्री राष्ट्रीय उत्कृष्टता सन्मान गौरव पुरस्कार - २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. सेवा फाऊंडेशनचे संचालक डॉ. संजय तिवारी यांच्या हस्ते खांडेभराड यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी कडाचीवाडी ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच रूपाली खांडेभराड, सेवा फाऊंडेशनचे अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गरिबांना अन्नदान, निराधारांना आधार, गरजूंना मदत, व्यवसाय व उद्योजकता या क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल डॉ. खांडेभराड यांना हा पुरस्कार देण्यात आला. समाजासाठी समर्पण आणि मौल्यवान योगदान देणाऱ्या उद्योजकांना हा पुरस्कार प्रतिवर्षी देण्यात येतो.

### महाळुंगे इंगळे येथे 9 मे रोजी " माझे कविता जन्माख्यान " काव्यसंग्रहाचे प्रकाशन



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे येथे शनिवारी (दि.९ मे) " माझे कविता जन्माख्यान " या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, अशी माहिती शामराव पवार व सत्यभामा पवार यांनी दिली. श्याम पवार यांनी हा काव्यसंग्रह लिहिला आहे. महाळुंगे इंगळे येथील स्कोडा कंपनी जवळील न्यू पॅराडाईज बँक्वेट्स अँड लॉन्स मध्ये शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. वेदांताचार्य डॉ. नारायण महाराज जाधव हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आमदार वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाच्या माजी अध्यक्षा डॉ. शकुंतला काळे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी पार्श्वगायक अवधूत गांधी यांचे सुश्राव्य गायन होणार आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन लाभ घेण्याचे आवाहन सत्यभामा पवार, महादेव बोत्रे, संजीव गव्हाणे, सुहास मोरे, प्रज्ञा बोत्रे, धनश्री गव्हाणे व स्मिता मोरे आदींनी केले आहे.

# रंगावलीतून पुण्यात अवतरली खंडेरायाची जेजुरी

**'जय मल्हार' भव्य रांगोळी प्रदर्शनात साकारले खंडोबा चरित्र ; श्रीरंग कलादर्पण फाउंडेशनच्या वतीने आयोजन ; विनामूल्य प्रवेश**

पुणे (दै. संध्या)

मणी मल्लाचा वध करण्यासाठी शिवाने घेतलेला खंडोबाचा अवतार... तळी भरणे...जागरण गोंधळ...खंडोबा आणि देवी म्हाळसाचा विवाह सोहळा... मल्हारी मार्तंडाचे तेजस्वरूप...अशा भगवान महादेवाच्या मार्तंड भैरव श्री खंडोबा देवाच्या अवताराचे चरित्र विविधांगी रांगोळ्या मधून साकारत जेजुरीच जणू पुण्यात अवतरली आहे.



श्रीरंग कलादर्पण फाउंडेशनच्या वतीने अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवावर आधारित 'जय मल्हार' या भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन बालगंधर्व कलादालन येथे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे भारतातील द्वादश मार्तंड खंडोबा लिंग तसेच जेजुरी खंडोबा मंदिर येथील खंडोबा देवाच्या मानाच्या पगडीचे दर्शन देखील यानिमित्ताने पुणेकरांना मिळत आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन श्री मार्तंड देव संस्थान जेजुरीचे अध्यक्ष ॲड. विश्वास पानसे व विश्वस्त मंडळ, ह. भ. प. शिवाजी महाराज मोरे, अभिनेते देवदत्त नागे, कल्पेश गोसावी, सुप्रसिद्ध रंगावलीकार जगदीश चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजक प्रा. अक्षय शहापूरकर, प्रतीक अथणे, अजित पवार, दिनेश मंची उपस्थित होते. प्रदर्शनादरम्यान बालगंधर्व रंगमंदिराच्या प्रांगणात खंडेरायाच्या पालखीचे देखील आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात 'श्री खंडोबा चरित्र' ३० वेगवेगळ्या रांगोळ्यांमधून साकारण्यात आले आहे. प्रा. अक्षय शहापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली १०० विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

प्रत्येक रांगोळी साकारण्यासाठी साधारण ४० ते ४८ तासांचा कालावधी लागला असून, एकूण सुमारे ५०० किलो रांगोळीचा वापर करण्यात आला आहे.

### जेजुरीत श्री स्वामी मठात आंब्यांची आरास



जेजुरी : दिनांक 30 महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तळवाकाठी असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मठात आंब्यांची आरास करण्यात आली आहे. जेजुरीच्या ऐतिहासिक होळकर तलवाकाठी श्री स्वामीमय सेवा ट्रस्टच्या वतीने श्री स्वामी समर्थांचा भव्य मठ उभारण्यात आला आहे. गुरुवार आणि शुक्रवारी असणाऱ्या पौर्णिमेनिमित्त मंदिरात आंब्यांची सजावट करण्यात आली आहे. श्री स्वामीमय सेवा ट्रस्टचे अध्यक्ष गणेश मोरे, उपाध्यक्ष माऊली खोमणे व स्वामिभक्तांच्या वतीने ही सजावट करण्यात आली आहे.

## आग्र्याहून सुटका ते अफजल खान वध; राज ठाकरेंनी मांडले स्पष्ट मत

पुणे (दै. संध्या)

सण-सणावळीच्या निमित्ताने इतिहास केवळ वाचण्यासाठी नसतो, तर त्यातून काय शिकायचे हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातील भाषणात केले. ते म्हणाले की, "कोण कधी जन्माला आलं, कोण कधी गेलं हे लक्षात ठेवण्यापेक्षा त्या इतिहासातून आपण काय बोध घेतो हे अधिक महत्त्वाचे आहे. ज्यांना लक्षात ठेवायचे त्यांनी ते ठेवावे, पण आपण त्यातून काय शिकतोय, हा खरा प्रश्न आहे." यावेळी त्यांनी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा उल्लेख करत सांगितले की, "शिवचरित्र वाचताना किंवा ऐकताना त्यातून बोध घ्यायला हवा. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळातच आजच्या काळात कसे जगावे, याचे मार्गदर्शन केले आहे." राज ठाकरे पुढे म्हणाले की, "आपण इतिहासात आग्र्याहून सुटका, अफजल खानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटं छाटणे किंवा सिद्धी जोहरचा वेढा तोडणे अशा घटना वाचतो. मात्र, त्या मागील शिकवण समजून घेणे गरजेचे आहे. त्या ५० वर्षांच्या कार्यकाळात शिवछत्रपतींनी समाजाला काय शिकवले, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे." महाराष्ट्राच्या परंपरेबद्दल बोलताना ते म्हणाले, "महाराष्ट्र हे असे राज्य आहे की, स्वातंत्र्यानंतर तयार झालेल्या इतर राज्यांच्या तुलनेत येथे प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारी माणसे आहेत.

## २८ जून रोजी पुण्यात 'क्विझ ऑन कोरिया २०२६'ची प्राथमिक फेरी

पुणे (दै. संध्या)

कोरिया प्रजासत्ताकाच्या मुंबईतील वाणिज्य दूतावासातर्फे 'क्विझ ऑन कोरिया २०२६' या जागतिक स्पर्धेची प्राथमिक फेरी पुण्यात आयोजित करण्यात आली आहे. कोरियाच्या परराष्ट्र मंत्रालय आणि कोरियन ब्रॉडकास्टिंग सिस्टम (केबीएस) यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच पुण्यातील किंग सेजोंग इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने ही स्पर्धा होणार आहे, अशी माहिती कोरियाचे मुंबईतील उपवाणिज्यदूत क्येओंगबेओम किम आणि किंग सेजोंग इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. एउंजू लिम यांनी पत्रकार परिषदेत दिली. क्येओंगबेओम किम म्हणाले, "भारतासाठीची प्राथमिक फेरी २८ जून २०२६ रोजी पुण्यातील किंग सेजोंग




इन्स्टिट्यूट येथे होणार आहे. या स्पर्धेद्वारे सहभागी विद्यार्थ्यांना कोरियाची भाषा, संस्कृती, इतिहास आणि समाज याबाबतचे ज्ञान सादर करण्याची संधी मिळणार असून, कोरियाबद्दलची आवड वाढविण्याचा उद्देश आहे. 'क्विझ ऑन कोरिया' हा दक्षिण कोरिया सरकारचा प्रमुख सांस्कृतिक उपक्रम आहे. जगभरातील कोरियन दूतावासांमार्फत प्राथमिक फेऱ्या घेतल्या जातात आणि प्रत्येक देशातून एक विजेता अंतिम फेरीसाठी कोरियात सहभागी होतो." पुण्यातील प्राथमिक फेरीतील विजेता भारताचे प्रतिनिधित्व अंतिम फेरीत करणार असून, अंतिम फेरीतील स्पर्धकांना कोरियन संस्कृतीचा अनुभव घेण्यासह तेथील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमामुळे भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भविष्यातही सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुकांनी @s.korea.in.mumbai या अधिकृत इन्स्टाग्राम हँडलद्वारे नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी mumbai@mofa.go.kr या ई-मेलवर किंवा ९८२०२७२७९१ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे डॉ. एउंजू लिम यांनी सांगितले.

## जागरूकता आणि कृती यांमधील दरी सांधणे: उत्पादन साक्षरतेचे 'मालकीभाव'मध्ये रूपांतर

पुणे (दै. संध्या)

आपण अशा युगात जगत आहोत जिथे सर्वसामान्य भारतीय व्यावसायिक हा आर्थिक संज्ञांचा चालता-फिरता ज्ञानकोश आहे. तरीही आपली निवृत्तीची तयारी कमीच आहे ही आश्चर्याची बाब आहे. आपण एक असा देश आहोत जो एक सिद्धांत म्हणून निवृत्ती नियोजनाची गरज ओळखतो, पण व्यवहारात त्याला एक 'तातडीची नसलेली चैनीची गोष्ट' मानतो. हीच आहे 'जागरूकता-कृती यांच्यातील दरी' आणि ती भरून काढणे हे आता केवळ एक आर्थिक ध्येय राहिलेले नाही, तर ते वैयक्तिक आत्मसन्मानासाठी एक गरज बनले आहे.

इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी (आयरिस) ५.० च्या



आकडेवारीतून एक सातत्यपूर्ण अवलंबित्व पूर्वग्रह दिसून येतो. त्यात भारतीयांचा एक मोठा वर्ग अजूनही आपल्या मुलांनाच आपले अंतिम सुरक्षा कवच मानतो.

अनुराग गुप्ता, संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी, पार्टनरशिप चॅनेल, ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लि. म्हणाले की, भारतातील आरोग्यसेवेचा खर्च सर्वसाधारण महागाईच्या दरापेक्षा जवळपास दुप्पट वेगाने वाढत असल्याने तुमच्या कुटुंबावर आर्थिक भार बनण्यापासून वाचण्यासाठी तुमची आर्थिक मालकी हीच तुमची एकमेव ढाल आहे. टियर २ आणि ३ भौगोलिक प्रदेशांमध्ये संयुक्त कुटुंब पद्धतींपासून दूर जाण्याच्या बदलामुळे "आत्मनिर्भरता" हा आता पर्याय राहिलेला नाही, तर ती एक भौगोलिक-निरपेक्ष गरज बनली आहे. वयाच्या सत्तरीत वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ रोख रकमेची गरज असते वडिलोपार्जित जमिनीच्या तुकड्याची नव्हे.

हाच तरलतेचा सापळा आहे. आयरिस ५.० हे अधोरेखित करते की, भारतीयांची निवृत्तीसाठीची बहुतांश बचत अशा साधनांमध्ये अडकलेली आहे, जी नियमित आणि अंदाजित रोख प्रवाह देत नाहीत. दर महिन्याला 'घरातील चूल पेटती ठेवणे' हे उद्दिष्ट असते. यासाठी वार्षिकी आणि निवृत्तीवेतन उत्पादनांकडे वळणे आवश्यक आहे, जे उत्पन्नाचा एक स्थिर, खात्रीशीर प्रवाह देतात आणि तुमची संपत्ती तुम्हाला नेमकी गरज असेल तेव्हा उपलब्ध होईल याची खात्री देतात.

आयरिस ५.० मधील कदाचित सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नियोजन आणि मानसिक स्वास्थ्य यांच्यातील सहसंबंध. लवकर नियोजन करणारे लोकांच्या मनात चिंता कमी असते आणि जीवनातील समाधान खूप असते. सेवानिवृत्तीची मालकी म्हणजे फक्त बँकेतील शिल्लक नाही तर मानसिक शांती मिळवणे आहे.

## आरटीई २५ टक्के राखीव प्रवेशांसाठी अंतिम मुदतवाढ; पालकांना ८ मे पर्यंत संधी

पुणे (दै. संध्या)

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता आठ मेपर्यंत पालकांना कागदपत्र पडताळणी करून प्रवेश घेता येणार आहे. दरम्यान, गुरुवारी सायंकाळपर्यंत सुमारे ७२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशाची प्रक्रिया राबवण्यात येते. यंदा राज्यातील आठ हजार ७०१ शाळांमधील एक लाख १४ हजार ८२६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यासाठी दोन लाख ८९ हजार २८६ अर्ज दाखल झाले. या प्रवेशासाठी सहा एप्रिलला ऑनलाइन सोडत काढण्यात आली. त्यानंतर १० एप्रिलला निवड यादी जाहीर करण्यात आली. यात प्रवेशासाठी निवड झालेल्या बालकांच्या शाळा प्रवेशासाठी २० एप्रिलपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर, ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता शिक्षण विभागाने पुन्हा एकदा आठ मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे. आरटीई २५ टक्के अंतर्गत मोफत प्रवेशासाठी निवड यादीतील प्रवेशाची ही अंतिम मुदतवाढ आहे.




## महिलांच्या त्यागामुळेच कुटुंबाची व देशाची प्रगती : उपमहापौर

पुणे (दै. संध्या)

कुटुंबाच्या प्रगतीसाठी महिलांना अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो, महिलांच्या सन्मानात दरवर्षी जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. परंतु वर्षातील एक दिवस महिलादिन साजरा करण्याऐवजी रोज आत्मीयतेने महिलांना मान, सन्मान देऊन आदर राखून त्यांचे कौतुक केले पाहिजे. महिलांच्या त्यागामुळेच त्यांच्या कुटुंबाची आणि देशाची प्रगती होते. आज देशाच्या राष्ट्रपती पदावर, राज्याच्या उपमुख्यमंत्री पदावर, राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक पदांवर महिला कार्यरत आहेत. त्या सर्व सावित्रीच्या, जिजाऊंच्या आणि रमाईच्या लेकींमुळेच देशातील लोकशाही बळकट होत आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. पिंपरी चिंचवड महिला पत्रकार संघाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि. २८) स्नेह मेळावा व नवनिर्वाचित नगरसेविका, बचत गटांच्या अध्यक्षा, महिला पत्रकार यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमहापौर बाबर बोलत होत्या.

## सुदृढ स्नायू, सुडौल शरीरासाठी 'वंडर एक्सॉन' तंत्रज्ञान प्रभावी

**डॉ. पल्लवी अहिरे-शेळके यांची माहिती; बाणेरमधील 'स्किनएथिक्स'ने आणले भारतातील पहिले प्रगत तंत्रज्ञान**

पुणे (दै. संध्या)

बदलती जीवनशैली, जिमसाठी मर्यादित वेळ आणि झटपट परिणामांची वाढती अपेक्षा यामुळे फिटनेस क्षेत्रात 'मसल टोनिंग' हा नवा सायन्स-बेस्ड ट्रेंड ठरत आहे. फक्त वजन कमी करणे म्हणजे शरीर सुदृढ होणे नव्हे; शरीर खरोखर सुदृढ होण्यासाठी आणि योग्य पद्धतीने वजन कमी करण्यासाठी संपूर्ण शरीरातील स्नायू वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही शास्त्रक्रियेविना वजन कमी करण्यासह सुदृढ स्नायू आणि सुडौल शरीरासाठी 'वंडर एक्सॉन' तंत्रज्ञान प्रभावी ठरत आहे. या जागतिक तंत्रज्ञानाचे भारतामधील पहिले 'वंडर एक्सॉन' प्रगत तंत्रज्ञानाधारित उपचारपद्धती बाणेर येथील स्किनएथिक्स हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाली आहे, अशी माहिती प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ व स्किनएथिक्स हॉस्पिटलच्या संस्थापिका डॉ. पल्लवी अहिरे-शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी स्किनएथिक्स येथील डॉ. कांचन मुळे, डॉ. प्राजक्ता शर्मा, डॉ. प्रियांका बोबडे, बाणेर-बालेवाडी मेडिकल असोसिएशनचे संस्थापक डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.




अठरा वर्षांहून अधिक वैद्यकीय अनुभव असलेल्या डॉ. पल्लवी अहिरे-शेळके म्हणाल्या, "गेल्या बारा वर्षांपासून स्किनएथिक्स हॉस्पिटल पुण्यात त्वचा, केस आणि सौंदर्य उपचारांच्या क्षेत्रात आधुनिक आणि सुरक्षित उपचार सुविधा देत नवे मानदंड निर्माण करत आहे. त्वचारोगतज्ज्ञांच्या देखरेखीखाली, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून येथे उपचार केले जातात. त्वचा, केस आणि लेझर उपचारांसोबतच आता शरीराच्या आकारामध्ये सुधारणा करणारे उपचारही येथे उपलब्ध आहेत. आधुनिक त्वचारोगशास्त्र, प्रगत यंत्रणा आणि जीवनशैली मार्गदर्शन यांच्या मदतीने सुरक्षित, परिणामकारक आणि दीर्घकाळ टिकणारे परिणाम देण्यावर भर दिला जातो. पुण्यातील रुग्णांना जागतिक दर्जाचे, उपचार देण्याचे स्किनएथिक्सचे उद्दिष्ट आहे."

"स्किनएथिक्सची कार्यपद्धती वेगळी असून, केवळ बाहेरून दिसणारी समस्या कमी करण्यावर नाही, तर त्यामागील मूळ कारण समजून दीर्घकालीन आणि टिकाऊ परिणाम देण्याच्या उद्देशाने आम्ही वैद्यकीय सेवा पुरवतो. प्रत्येक रुग्णाला प्रामाणिक सल्ला, वैयक्तिक उपचार योजना आणि वैज्ञानिक आधारावर उपचार दिले जातात. 'वंडर एक्सॉन' ही एक शस्त्रक्रिया न करता केली जाणारी आधुनिक शरीररचना सुधारणा पद्धत आहे. या तंत्रज्ञानामध्ये उच्च क्षमतेचे न्यूरोमस्क्युलर स्टिम्युलेशन आणि रेडिओफ्रिक्वेन्सी यांचा एकत्रित वापर केला जातो. या दोन्ही तंत्रज्ञानामुळे स्नायू मजबूत होतात आणि त्वचा ताणली जाते. त्यामुळे शरीराचा आकार अधिक टोन होतो, त्वचेतील घट्टपणा वाढतो आणि चरबी कमी होण्यास मदत होते, याचा उपयोग शारीरिक व्याधींमुळे व्यायाम न करू शकणाऱ्या रुग्णांना, युरिनरी इन्कॉन्टिनन्स, डायस्टॅसिस तसेच जीएलपी इंजेक्शन्स घेत असताना स्नायू कमी होणाऱ्या रुग्णांना घेता येईल," असेही त्यांनी सांगितले.